दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

बुधवार, दि. २७ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# मुंबईला टीबीमुक्त करण्यासाठी लोकसहभाग आवश्यक

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा : राज्यपालांच्या उपस्थितीत 'टीबी मुक्त मुंबई' अभियानाला सुरुवात

मुंबई (दै. संध्या)




'टीबी मुक्त भारत अभियान' मुंबईच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या अभियानाचा शुभारंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत सायन येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय येथे आज करण्यात आला. राज्यपालाच्या हस्ते राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवी संस्थांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. लोकभवनच्या पुढाकाराने आयोजित 'टीबी मुक्त मुंबई' मोहिमेच्या उद्घाटनाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, आमदार कॅप्टन तमिल सेल्वन, आमदार डॉ. ज्योती गायकवाड, आमदार सुनील शिंदे, महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य समितीचे अध्यक्ष हरीश भांदिर्गे, शिक्षण समितीच्या अध्यक्ष राजेश्री शिरवाडकर, मार्केट व गार्डन समितीचे उपाध्यक्ष भास्कर शेट्टी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, डॉक्टर्स, आशा सेविका आणि महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी 'टीबी मुक्त मुंबई' च्या अभियानावर आधारित माहिती पुस्तकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

बृहन्मुंबई आणि आसपासच्या परिसराची लोकसंख्या जवळपास दोन कोटींच्या घरात पोहोचली आहे. दाट लोकवस्तीमुळे टीबीसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्याचा धोका अधिक आहे. त्यामुळे लोकभवनच्या पुढाकाराने 'टीबी मुक्त मुंबई' अभियान सुरु करण्यात आले असून अभियानात लोकसहभाग आवश्यक असल्याचे राज्यपालांनी सांगितले. मुंबईला टीबीमुक्त करण्यात आपण यशस्वी झालो, तर ते केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी उदाहरण ठरेल. त्यामुळे मुंबईची प्रतिमा अधिक चांगली होईल. या अभियानाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी, रेड क्रॉस सोसायटी, एनसीसी, 'माय युवा भारत'चे स्वयंसेवक, स्काऊट व गाईड, स्वयंसेवी संस्था तसेच विविध सामाजिक संघटनांना सहभागी केले जाणार आहे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

टीबीवर योग्य वेळी उपचार केल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. यासाठी शासनाकडून तपासणी व उपचाराच्या सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात, याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्यासाठी देश टीबी मुक्त होणे आवश्यक असून त्या दृष्टीने 'टीबी मुक्त मुंबई' अभियान महत्वाचे आहे. सरकार आणि समाजाने एकत्रित येऊन कार्य केल्यास हमखास यश लाभते असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. सुरुवातीला राज्यपालांनी धारावी येथील एकनाथराव गायकवाड आरोग्य केंद्र येथे क्षयरोग अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका यांचेशी संवाद साधला; तसेच क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वितरण केले. या कार्यक्रमात राज्यपालांनी 30 क्षयरुग्णांच्या पोषण आहाराची जबाबदारी स्वीकारली. राज्यपालांच्या या निर्णयाबद्दल महापौर रितू तावडे यांनी राज्यपालांना 'निक्षय मित्र' प्रमाण पत्र प्रदान केले. राज्यपालांच्या हस्ते भारत पेट्रोलियम, न्यारा एनर्जी, अदाणी फाउंडेशन, मेट्रोपोलीस हेल्थ आदी संस्थांना त्यांच्या क्षयरोग अभियानातील सहभागाबद्दल प्रशस्ती प्रमाणपत्र देण्यात आले.

# सावंतवाडी रेल्वे स्थानकाला 'मधु दंडवते' यांचं नाव

## कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतही महत्त्वपूर्ण मंजुरी

मुंबई (दै. संध्या)



राज्याच्या आज पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्वाचे निर्णय घेण्यात आले. आजच्या बैठकीत सिंधुदुर्गातील सावंतवाडी रेल्वे स्थानकाला कोकण रेल्वेचे शिल्पकार ज्येष्ठ नेते दिवंगत मधु दंडवते यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सावंतवाडी रेल्वे स्थानकाचे नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असे करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचे नाव देण्याची कोकणातील जनतेची अनेक वर्षांची मागणी राज्य सरकारने मार्गी लावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सावंतवाडी रेल्वे स्थानकाच्या नामकरणाबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. याशिवाय शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणेस मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. उद्योग विभागाने डोंबिवलीतील सोनारपाड्यातील पिंपळेश्वर मंदिराला जमीन देण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मौजे सागाव सोनारपाडा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला ४ एकर २५ गुंठे जमीन मिळणार आहे. या जमिनीवरील मंदिर ट्रस्टचा वापर नियमित करण्यास व ही जमीन ट्रस्टला नाममात्र दरात देण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

# कांदा उत्पादकांना वाऱ्यावर सोडणार नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई (दै. संध्या)



■ अमित शाहांच्या बैठकीत सकारात्मक तोडगा निघेल

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केंद्र आणि राज्य सरकार पूर्णपणे संवेदनशील असून, केंद्रीय सहकार व गृहमंत्री अमित शाह यांनी बोलावलेल्या बैठकीत निश्चितच सकारात्मक तोडगा निघेल, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. शिंदे म्हणाले की, राज्य सरकार आणि केंद्र सरकारने कांदा खरेदी केंद्रे सुरू केली असून सध्या १५ रुपये ८० पैसे प्रति किलो या दराने कांदा खरेदी केली जात आहे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडले जाणार नाही. त्यांच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

"कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी सरकारला पूर्णपणे माहीत आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत आहे. उद्या होणाऱ्या बैठकीत अमित शाह यांच्याकडून यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल,"असे शिंदे म्हणाले. विरोधकांच्या आंदोलनांवर टीका करताना त्यांनी म्हटले की, "विरोधकांकडे आता कोणतेही ठोस मुद्दे उरलेले नाहीत. त्यामुळे केवळ प्रसिद्धीसाठी आणि मीडियात झळकण्यासाठी आंदोलनांचा आधार घेतला जात आहे. ही शेतकऱ्यांच्या हिताची लढाई नसून निव्वळ स्टंटबाजी आहे." यूपीए सरकारच्या काळाची आठवण करून देताना शिंदे म्हणाले की, "काँग्रेसच्या सत्ताकाळातही कांद्याने जनतेला रडवले होते. त्या वेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रभावी पावले उचलली गेली नव्हती. आज मात्र केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे."

# शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मुदतवाढ

मुंबई (दै. संध्या)



राज्यात गेले महिनाभर सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा धुमधडाका सुरू आहे. महत्त्वाच्या पदावर बदली मिळावी यासाठी अनेक अधिकारी कर्मचाऱ्यांकडून स्थानिक आमदार आणि मंत्र्यांचे उंबरठे झिजवले जात आहेत. बदलीसाठी मोठी देवाण घेवाण सुरू असून मे अखेरपर्यंत आपल्या विभागांतील बदल्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मंत्री धडपडत आहेत. विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहिता आणि राज्यात सुरू असलेली जनगणना तसेच मतदार याद्यांचे परीक्षण यामुळे बदल्यांच्या प्रक्रियेत अडचणीत येत आहेत. या प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना यापूर्वी स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील नियमित बदल्यांना मुदतवाढ देण्याच्या हालचाली शासन दरबारी सुरू होत्या. त्यानुसार आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे या बदल्या आता मंत्री स्तरावरच करण्यास मुभा मिळाली आहे.

नियमानुसार सरकारी कर्मचाऱ्यांची 3 वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर बदली होते. काही संवेदनशील किंवा दुर्गम भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा कालावधी वेगळा असू शकतो. सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या वर्षातून केवळ एकदाच, म्हणजेच एप्रिल किंवा मे महिन्यात केल्या जातात. प्रशासकीय कारणास्तव किंवा आपत्कालीन परिस्थितीत वर्षाच्या कोणत्याही वेळी बदली करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याला म्हणजेच मुख्यमंत्र्यांना असतात.

गट-क (Group-C) आणि गट-ड (Group-D) मधील कर्मचाऱ्यांसाठी पारदर्शकता राखण्यासाठी समुपदेशनाद्वारे (Counseling) बदल्यांचे धोरण सरकारने लागू केले आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांना त्यांच्या आवडीच्या रिक्त जागांची निवड करण्याची संधी दिली जाते.

बदल्यांसाठी कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा बाह्य दबाव आणण्यास सक्त मनाई असली तरी अनेक अधिकारी, कर्मचारी आपल्या आवडीच्या ठिकाणी बदलीसाठी मंत्री, आमदारांची शिफारशी घेतात. त्याचप्रमाणे गंभीर आजार, पती-पत्नी एकत्रिकरण किंवा इतर वैयक्तिक अडचणींच्या कारणास्तव नियमानुसार विनंती बदल्यांचा पर्याय उपलब्ध असतो.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ. त्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सूधारणेस मान्यता देण्यात आली आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## एसटीमध्ये डिझेल बचतीसाठी राज्यव्यापी मोहीम राबविणार

# इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती : प्रताप सरनाईक

मुंबई (दै. संध्या)

■ डिझेल बचतीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या चालकांना प्रोत्साह

■ आगारनिहाय उद्दिष्टे निश्चित करण्याचे निर्देश



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी " इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती " ही व्यापक संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते या अनुषंगाने मंत्रालयातील आपल्या दालनात बोलावलेल्या एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते.

एसटी महामंडळाला सध्या दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासत असून, इंधन खर्च कमी करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटीच्या प्रत्येक आगाराने दररोज किमान ५ लिटर डिझेल बचतीचे उद्दिष्ट निश्चित केले, तरी संपूर्ण राज्यभरातून दररोज किमान १००० लिटर डिझेलची बचत होऊ शकते. सध्याच्या डिझेल दरानुसार ही बचत दररोज जवळपास १ लाख रुपयांपर्यंत जाऊ शकते. "लहान बचतीतून मोठी आर्थिक नशिस्त निर्माण होते आणि हीच बचत भविष्यात एसटीसाठी मोठी ताकद ठरू शकते," असेही त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर सर्व विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांना तातडीने आगारनिहाय डिझेल बचतीची उद्दिष्टे निश्चित करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत. प्रत्येक आगाराने आपल्या बसगाड्यांच्या इंधन वापराचे नियमित विश्लेषण करून बचतीसाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे आदेशही देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डिझेल बचतीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या चालकांचा विशेष सत्कार करण्यात येईल तसेच त्यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याची योजनाही सुरू करण्यात येणार आहे. "एसटीचा चालक हा केवळ वाहन चालक नसून तो संस्थेच्या अर्थकारणाचा शिल्पकार आहे. जबाबदारीने आणि कौशल्याने वाहन चालवणारा चालक एसटीचे लाखो रुपये वाचवू शकतो," असे प्रताप सरनाईक यांनी म्हटले. याशिवाय ज्या आगारांनी निश्चित उद्दिष्टांपेक्षा अधिक डिझेल बचत केली असेल, त्या आगारांना दरमहा विशेष पुरस्कार आणि आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यामुळे आगारांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होऊन बचतीची चळवळ अधिक प्रभावी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वाहन चालविण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे ज्या चालकांच्या बसचे के.पी.एल. (किलोमीटर प्रति लिटर) प्रमाण कमी येत असेल, अशा चालकांचे समुपदेशन करून त्यांना पुनर्प्रशिक्षण देण्यात येणार आहे. इंधन बचतीसाठी वेग नियंत्रण, योग्य गिअरचा वापर, अनावश्यक इंजिन सुरू ठेवणे टाळणे, ब्रेकिंग पद्धतीत सुधारणा यांसारख्या बाबींवर विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

तसेच बसेसची दैनंदिन तांत्रिक तपासणी, वेळेवर दुरुस्ती आणि इंजिन कार्यक्षमतेची नियमित पाहणी यावर भर देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. टायर प्रेशर, इंजिन ट्युनिंग, ऑईल गळती, ब्रेक प्रणाली यांसारख्या तांत्रिक बाबींमधील त्रुटीमुळेही इंधनाचा अपव्यय होतो. त्यामुळे कार्यशाळा स्तरावर अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# शौचालय सफाईसाठी सुशिक्षित एमबीए मजूर, सत्ताधारी पक्षाच्या धोरणामुळे कर्मचाऱ्यांची अडचण



मुंबई (दै. संध्या)

"महापालिकेत वारसा हक्काने समाविष्ट झालेल्या कर्मचाऱ्यांबाबत महासभेने नुकतेच आदेश दिले आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती सफाई कर्मचारी म्हणून झाल्याने त्यांना सफाईचीच कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत."

**सचिन बांगर, उपायुक्त**
**(सार्वजनिक आरोग्य विभाग )**

मिरा-भाईंदर महापालिकेत वारसा हक्काने सेवेत समाविष्ट झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सुशिक्षित वारसांना आता प्रत्यक्ष सफाईची कामे करावी लागत असल्याची बाब समोर आली आहे. सत्ताधारी पक्षाच्या पुढाकाराने महासभेत घेतलेल्या निर्णयानंतर काही कर्मचाऱ्यांना शौचालय सफाईसारखी कामे देण्यात आली असून, यामध्ये एमबीएपर्यंत शिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे.

मिरा भाईंदर महापालिकेत चतुर्थ श्रेणीतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासनाच्या आदेशानुसार सेवेत समाविष्ट करण्यात आले होते. सफाई कर्मचाऱ्यांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शासनाने हे धोरण लागू केले होते. या प्रक्रियेत प्रामुख्याने सफाई कर्मचाऱ्यांच्या पत्नी, मुलगा, सून तसेच संबंधित कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींना संधी देण्यात येते. यापूर्वी प्रशासनाकडून या वारसांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार विविध विभागांमध्ये काम देण्यात आले होते. मात्र, वारसा हक्क भरती प्रक्रियेत अनेक अनियमितता झाल्याच्या तक्रारी पुढे आल्याने हा विषय अलीकडील महासभेत गाजला. नियुक्ती प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याची नोंद सत्ताधारी भाजपकडून करण्यात आली असून, यासंदर्भातील सविस्तर माहिती पुढील महासभेत सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाला महासभेची सर्वानुमते मंजुरी मिळाली. दरम्यान, या प्रकरणाची माहिती महासभेसमोर सादर होईपर्यंत सफाई व्यतिरिक्त काम करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांचे मे महिन्यापासूनचे वेतन रोखण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, सफाई कर्मचारी म्हणून नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांनी सफाईचेच काम करावे, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे वारसा हक्काने सेवेत आलेल्या अनेक सुशिक्षित कर्मचाऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. खासगी क्षेत्रात रोजगाराच्या मर्यादित संधी आणि आर्थिक गरजेमुळे अनेकांना नाईलाजास्तव सफाईची कामे स्वीकारावी लागत आहेत. यामध्ये एमबीए शिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांकडूनही शौचालय सफाईची कामे करून घेतली जात असल्याचे समोर आले आहे.

## संपादकीय

# ‘तथाकथित’ विकास आपल्याच सुखाच्या मुळावर येऊ लागलाय का?

शहरं म्हणजे धूळ, धुरे, सिमेंट, गर्दी, आवाज, धकाधकी-धांदल... हा समज आज-आत्ताचा नाही. नागर जीवनाच्या सुरुवातीपासून माणसांना त्यांच्या निसर्गाशी बांधलेल्या आणि आता विस्मृतीत गेलेल्या गतायुष्यांची आठवण कातर करत आलेली आहे. आजही ‘गावाकडची ज्वारी ! लागती का नई भाकर ग्वाड?’ म्हटल्यावर भाकरीचा तोच घास आपल्याला जरा जास्त गोड लागतो. त्याची कारणं या आदिम स्मृतीत आहेत. पण माणसांना निसर्गाची कितीही ओढ लागली, तरी नागर जीवन हाही सुरक्षिततेच्या आदिम शोधाचाच भाग आहे. त्यामुळे ‘गड्या आपुला गाव बरा..’ हेही खरं नि ‘कशासाठी, पोटासाठी..’हेही!

माणसं आपल्या खटपट्या स्वभावानुसार या द्वंद्वावरही उत्तरं शोधत आलीयत. एबेंझर हॉवर्ड नामक इंग्लिश माणसानं एकोणिसाव्या शतकात बागा असलेली नियोजित शहरं वसवण्याची कल्पना मांडली. विशिष्ट भूभागावर मर्यादित घरांचं नियोजन असं करायचं, की सगळ्या शहरी सोयी उपलब्ध असतील; पण सगळ्यांना खासगी आणि सामाईक बागा उपभोगायला जागाही असेल. खूप लोकप्रिय झालेली ही कल्पना तेव्हापासून ते आजतागाईत जगभर सगळीकडे कमी-अधिक फरकानं राबवली जात असते. लंडनची फुफ्फुसं मानली जाणारी, शहराच्या मध्यभागी वसवलेली भली-मोठी उद्यानं तर प्रसिद्ध आहेतच. पण इतिहासाच्या एका टप्प्यावर झाडांना कुरूप मानून एकाही झाडाशिवायचे रस्ते नि इमारती वसवणारं पॅरिसही गेल्या काही वर्षांत कंबर कसून शहर हिरवंगार करण्याच्या मागे लागलंय. सिंगापूरसारख्या आशियाई शहरातही उपलब्ध जागा कसोशीनं वापरून घेत आडव्या नि उभ्या बागा राखलेल्या दिसतात. अमेरिकेत मुद्दाम राखलेली, निगुतीनं जोपासलेली थोडीथोडकी नव्हेत, त्रे-स-ष्ठ राष्ट्रीय उद्यानं आहेत. भारतात मुघलांनी कितीतरी बागा कल्पकपणे निर्मिल्या नि राखल्या. आपण ती परंपरा पुढे चालू ठेवली. आजही दिल्लीत, बंगळुरात आणि मुंबईतही मुद्दाम राखलेल्या मोठाल्या हिरव्यागार बागा आणि जलाशय आहेत. अशा जागांमध्ये स्थानिक झाडंझुडपं आणि वृक्षसंपदा फोफावतात, त्यावर जगणाऱ्या प्राण्यांच्या नि कीटकांच्या परिसंस्था नांदतात, दूरदेशची पाखरं दरसाल येऊन विसावतात. एरवी आपल्या जगण्यातून अधिकाधिक हरपत चाललेला निसर्ग अनुभवण्याची संधी तिथे मिळते. परागीभवन करणाऱ्या माश्या, फुलपाखरं, अळ्या, वटवाघळं यांना थोडा निरामय अवकाश मिळतो. भटके प्राणी आणि कष्टकरी लोक सावली बघून घटकाभर माथा टेकतात. माणसांना घरापासून जरा लांब; पण माणसांच्यात राहून पाय मोकळे करायचे असतात, चार माणसांना भेटून सुखदुःखाचं बोलायचं असतं, मोकळी हवा खायची असते, थोडं गॉसिप-थोडा व्यायाम-थोडं चिंतन करायचं असतं. शहरी आयुष्यात हे सगळं करायला लागणारा स्थलावकाश बागा आणि तळी देऊ करतात. लंडनच्या हाइड पार्कमधल्या ‘स्पीकिंग कॉर्नर’मध्ये कुणालाही जाहीरपणे आपलं मत व्यक्त करता येतं. काहीही बोललं तरी बोलणाऱ्याला त्याबद्दल शिक्षा करण्याचा प्रघात नाही. तिथे अभिव्यक्तिस्वातंत्र्याला अभय दिलेलं असतं. खदखदत्या असंतोषाची वाफ दवडण्याची - आणि मोकळं होऊन पुन्हा आपल्या व्यग्र आयुष्यात धावू लागण्याची सर्वतोपरी संधी - बागा देतात, शहरांना शब्दशः थोडा श्वास घेऊ देतात. या सगळ्याशी तुम्ही आम्ही असहमत असण्याचं कारणच नाही, इतकं हे साधं-सरळ-सोपं-सोयीस्कर आहे. मग अडचण होते कुठे? आपल्याच शहरातली कांदळवनं, पुरातन वृक्षराजी, जॉगर्स पार्क्स, राष्ट्रीय उद्यानं राखण्यासाठी आपल्याला आंदोलनं करावी लागतायत, ती कशासाठी? कुणाच्या विरोधात? आपल्याला हवा असलेला ‘तथाकथित’ विकास आपल्याच सुखाच्या मुळावर येऊ लागलाय, असं तर नाही?

## संस्कृत सुभाषित

अयथाबलमारम्भ: प्राणोपरोधिनाम् ।

अर्थ – कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. आपल्या शक्तीपेक्षा जास्त काम आरंभिल्यास आयुष्यावर आणि शक्तीवरच त्याचा दुष्परिणाम होत असतो.

## गुरु वचन



**यश गाठायचे असेल तर स्वयंशिस्त हवीच**

ज्याप्रमाणे आग आपल्या उष्णतेच्या साहाय्याने सोन्याला उजळून टाकते, अगदी त्याचप्रमाणे स्वयंशिस्त कोणत्याही तरूणाचे व्यक्तिमत्त्व चमकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्वयंशिस्त बाळगणाऱ्या तरूणाची पावलं नेहमी यशाकडे वेगाने सरकत असतात; पण ही स्वयंशिस्त म्हणजे नेमके काय तर ही स्वयंशिस्त म्हणजे आपली पावलं योग्य दिशेकडे वळविणे. स्वयंशिस्तीमुळे तुम्ही कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहू शकता. डगमगून न जाता धैर्याने, संकटाचा सामना करू शकता. मात्र स्वयंशिस्त अंगी बाणण्यासाठी गरज असते ती आळस आणि सुखाचा त्याग करण्याची! स्वयंशिस्त लावून घेतल्याने कोणी लहान होत नाही. एकदा का आपण स्वत:ला शिस्त लावून घेतलीत की, तुमच्या व्यक्तिमत्त्वात आणि जीवनात बदल झालाच म्हणून समजा. यामुळे तुम्हाला नैतिक छळ आणि निरोगी आरोग्य लाभते, ते वेगळेच.

## उपदेशकथा

राजू एक गरीब इमानदार मुलगा होता. तो रामलाल नावाच्या एका जमिनदाराच्या घरी नोकरी करत होता. आपले काम तो वेळच्या वेळी करीत असे त्यामुळे त्याला कसलीही चिंता वाटत नसे. नेहमी त्याला आरामात झोप लागे. एका रात्री जोराचा वारा सुटला. वादळी वाऱ्याचं थैमान सुरू झाले. रामलालची झोप उडाली. तो घाबरला व बाहेर आला. पाहतो तर काय? राजू आरामात ओसरीवर गाढ झोपला होता. राजूच्या अशा बेफिकीर वृत्तीचा त्याला राग आला. त्याला वाटले, आता या वाऱ्याने सारा भुसार उडाला असेल, बैल दावे तोडून पळाले असतील. गवत खळ्यात पसरलेले असेल, या चिंतेने तो सैरावैरा धावू लागला. गोठ्यात गेला तर बैल व्यवास्थित आतमध्ये सुरक्षित जागी बांधलेले होते. गवताची पेंड छपराखाली ठेवली होती. भुशाच्या ढिगाऱ्यावर छप्पर घातले होते. हे पाहून तो प्रसन्न झाला. हे सारे काम राजूने अगोदरच करून ठेवल्याचे त्याच्या लक्षात आले. राजूच्या नियमितपणामुळे त्याला वादळातही सुखाची झोप लागते हे त्याला पटले.

कथा उपदेश : वेळच्या वेळी काम केल्याने धोका पत्करावा लागत नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:चित्रा (अहोरात्र) |
| २७ मे २०२६ | योग:व्यतीपात |
| बुधवार | २७:२४:३२+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि ०६:२२:०२ |
| अधिक ज्येष्ठ शके | करण:बव १९:०६:५८ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:तुला१८:५९:४२ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – १० |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:एकादशी | कमला एकादशी |
| ०६:२२:०२ | बकरीद |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 4 | | 5 | 7 | | |
| 3 | | 4 | | | 7 | 9 | 8 | |
| 7 | 2 | 6 | | | 9 | | | |
| | 4 | | | 5 | 8 | 2 | 7 | |
| | | | | | | | | |
| | 6 | 8 | 7 | 1 | | | 9 | |
| | | | 8 | | | 6 | 5 | 9 |
| | 3 | 9 | 6 | | | 8 | | 4 |
| | | 2 | 5 | | 4 | 3 | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 9 | 3 | 2 | 6 | 4 | 7 | 8 |
| 6 | 8 | 7 | 9 | 4 | 1 | 5 | 3 | 2 |
| 4 | 3 | 2 | 8 | 5 | 7 | 9 | 1 | 6 |
| 2 | 7 | 4 | 1 | 9 | 8 | 6 | 5 | 3 |
| 1 | 9 | 3 | 2 | 6 | 5 | 7 | 8 | 4 |
| 8 | 5 | 6 | 4 | 7 | 3 | 1 | 2 | 9 |
| 7 | 4 | 5 | 6 | 3 | 2 | 8 | 9 | 1 |
| 3 | 6 | 8 | 7 | 1 | 9 | 2 | 4 | 5 |
| 9 | 2 | 1 | 5 | 8 | 4 | 3 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १३२८ – फिलिप सहावा फ्रांसच्या राजेपदी
- १७०३ – झार पीटर द ग्रेटने सेंट पीटर्सबर्ग शहराची स्थापना केली
- १९३८ – ईब्न खल्दून, ट्युनिसीयाचा ईतिहासकार
- २००६ – इंडोनेशियातील जावा प्रांतात भूकंपामुळे ३००० लोक मृत्यूमुखी पडले.

### राष्ट्रीय

- २००६ – भारतीय वेगवान गोलंदाज अजित आगरकरने एक दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात २५० बळी पूर्ण केले. अशी कामगिरी करणारा तो जगातील १४ व्या क्रमांकाचा गोलंदाज ठरला.
- २००७ – अंदमान बेट जगात सर्वात जास्त टेलिफोन असलेले राज्य बनले.
- २००८ – पंढरपूरजवळ भीमा नदीत नाव उलटून झालेल्या दुर्घटनेत सहा जणांचा बुडून मृत्यू झाला.

### जन्म

- १३३२ – इब्न खलदून, अरब इतिहासकार.
- १३३२ – डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे, कादंबरीकार, कवी, मर्मग्राही समीक्षक.

### निधन

- १९६४ – पंडित जवाहरलाल नेहरू, भारताचे पहिले पंतप्रधान.
- १९८६ – प्रा. अरविंद मंगरुळकर, संगीत समीक्षक आणि संस्कृतचे अभ्यासक.
- १९९४ – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्रातील थोर विचारवंत, संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे प्रधान संपादक.
- २००६ – उन्नीकृष्णन, मल्याळम अभिनेते.
- २००७ – पर्सी सोन, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी)चे अध्यक्ष.

## : SMS :

Shahrukh Khan ki Film RAB NE BANA DI JODI se hamein kya sabaq milta hai. Umeed mat rakho. Shaadi Ke Baad bi larki pat sakti hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४१.४ | २७ |
| अहमदनगर | ४० | २५.९ |
| अकोला | ४६.८ | ३२.१ |
| अमरावती | ४५.४ | ३३.३ |
| बीड | ४७.७ | ३५.८ |
| भंडारा | ४७.८ | ३०.७ |
| बुलढाणा | ४३.५ | २६.५ |
| चंद्रपूर | ४७.४ | ३५.६ |
| चेन्नई | ४७.४ | ३३.३ |
| नवी दिल्ली | ४४.१ | ३०.९ |
| धुळे | ४५.३ | ३०.१ |
| गोंदिया | ४४.७ | २९.५ |
| जळगाव | ४७.३ | ३१.९ |
| कोल्हापूर | ३७.६ | २४.९ |
| लातूर | ३८.८ | २८.७ |
| मुंबई | ४१.५ | ३७.२ |
| नागपूर | ४५.७ | ३२.२ |
| नांदेड | ४४.७ | ३२.९ |
| नंदूरबार | ४०.५ | २६.८ |
| नाशिक | ३९.६ | २५.९ |
| पुणे | ३६.१ | २४.६ |
| पंढरपूर | ४१.८ | २७.४ |
| सातारा | ३७.७ | २३.७ |
| सांगली | ३८.७ | २५.४ |
| सोलापूर | ४२ | २९.६ |
| वर्धा | ४७.३ | ३३.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील.

**तूळ :** शुभ रंग : केशरी, अनुकूल दिशा : पूर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील.

**मिथून :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल.

**धनू :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम मुलांमुळे तनाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.

**मकर :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल. परिजनांमुळे तनाव होऊ शकतो.


**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम प्रतिष्ठा वाढेल. सहकार्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल. धर्माविषयी आस्था वाढेल. कर्ज आणि खर्चात कपात करा.

**कुंभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण नशीबाची पूर्ण साथ मिळेल. अधिकारीवर्गाचे सहकार्य मिळेल.

**कन्या :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम नवीन संबंधांचा फायदा होईल. धाडसाने कामे होणार नाही. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९६१



### आडवे शब्द

१. ’झुलतो बाई, रास झुला’ या गाण्याची पुढची ओळ
९. जहर
१०. वितरण
११. विश्व
१२. धुंदी, कैफ
१३. चषक
१४. श्वापद
१६. रंगकर्मी गोखले, वाघ यांचे नाव
१७. खरमरीत, जिभेला झोंबणारे
१९. श्रीरामाचा वंश
२१. पंगतीतील आसन
२२. उपयोग
२३. पात्याची तीक्ष्णता
२४. खडक
२५. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
२७. तटबंदी
२८. प्रयत्न, उद्योग
३०. कृष्णसखी
३१. वर्ष, साल
३२. तपासणी करणारा
३५. हालचाल
३६. शर्त, पण
३७. बदल
३८. समर्थ, योग्य
३९. लग्नकार्यात स्वयंपाक करणारा
४१. शरीर, देह
४२. गव्हाचे शिजवलेले सत्त्व
४४. चकमक, युद्ध
४५. ध्वनी, आवाज
४७. पायंडा, पद्धत
४८. स्वार्थी
५०. विरुद्ध मत, समीक्षा
५२. आणि
५३. ललाट
५४. त्रासदायक बडबड
५६. खाण्याची तंबाखू
५७. शासकीय
५९. धक्केपंजे माहीत नसलेला (स्वभाव)
६०. कर्ण
६१. कहाणीतील गाव
६५. गुणज्ञ
६७. मोकळा सोडलेला रेडा
६८. अप्रिय चवीचे
७०. तोंडी करार, आणाभाका
७३. लेखणी
७४. हाताच्या खुणांची भाषा
७५. रात्रीच फुलणारे सुगंधी फुलांचे झुडूप
७६. डोक्याला बांधण्याचे पूर्वीच्या काळचे वस्त्र

### उभे शब्द

१. अगदी नवीन, न वापरलेला
२. ब्राह्मण
३. उतपन्न, जन्म
४. सत्ता, सत्तेचा कालावधी
५. बिनवासाचे पांढरे फूल
६. हेतुपुरस्सर वेळ वाया घालविणे
७. खालच्या दर्जाचा
८. रात्रीच्या वेळीच कामे करणारा
९. उलट, विरुद्ध
१३. जोरदारपणे आवळून
१५. अनुत्तीर्ण
१६. पुष्कळ (ग्रामीण)
१८. शिव्या, शाप
२०. लाच (हिंदी)
२२. वितरण
२३. पळापळ, धांदल
२६. देवळाचे शिखर
२७. साहेबी वस्त्रविशेष (इंग्रजी)
२८. वाळा
२९. न शिजलेला दाणा
३०. जंगली
३१. खळबळजनक
३३. पायी चालणारा
३४. पाणी
३६. मृत्यू नसलेला
३७. मूळ आधार
४०. पद्धतीप्रमाणे
४१. ठाणे परिसरातील आदिवासी जमात
४३. तापदायक चिवचिवाट
४६. चाणक्यनीती
४८. आशीर्वाद
४९. लाल रंगाचा कंद
५१. अंजन
५५. रेशमाचे जाडसर कापड
५७. कायदेशीर, वैध
५८. यात पळवाटाच फार!
६०. कावळा
६२. पदर
६३. लोणी
६४. बेंड, उठाणू
६६. शालांत परीक्षेआधीची इयत्ता
६८. मनाचा ओढा
६९. मदाऱ्याचे चर्मवाद्य
६९अ. डाक
७१. खाशी, एकदम भारी!
७२. ओरखडा
७३. तांदळाचा तुटका दाणा

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.हात नको लावूस झाडाला ७.झाडपाला १०.तडक ११.मासा १२.खप १४.लाभला १५.शिवाजी १७.मूग २०.लाडका २१.वधूवर २२.मासलेवाईक २५.रमणा २७.कराल २९.लडी ३०.डबा ३३.विपरित ३५.मठ्ठ ३६.कल ३७.भविष्यकाळ ३८.सामना ४०.डाकोडाक ४१.गवा ४२.साय ४३.रजई ४४.वारसदार ४७.दारू ४८.वानर ५१.खनन ५२.सरबत ५४.फराळ ५५.पदरमोड ५७.खूण ५९.सरणे ६०.जनक ६१.बनकर ६३.डास ६५.काना ६६.गाजर ६७.पुणे ६८.पर ६९.चलनवलन ७१.म्हतारा ७२.जो तो ७३.शीर ७४.जनरीत ७७.तळ ७८.डीर ७९.पाल ८०.पारवा ८१.सावधान

उभे उत्तर : १.हातचलाखी २.तड ३.नकलाकार ४.लाजलावणा ५.सदाशिव ६.लामा ७.मागमूस ८.डब्ब ९.लाख ११अ.सारस १३.पल्ला १६.वारकरी १८.गलेलठ्ठ १९.खाई २२. माल २३.वाडी २४.कडकडाट २६.मनुका २८.रातसार ३१.बालक ३२.रविवार ३४.पसायदान ३५.मनाई ३७.भगवा ३९.मजकूर ४०.डालन ४५.समरस ४६.रखडणे ४८.वात ४९.रफ ५०.कळवळणे ५२.सणक ५३.बजबजपुरी ५५.पकडापकडी ५६.मोर नाचतो ५७.खून ५८.चाक ६०.जनावर ६२.नर ६४.सरदार ६५.कानशील ६७.पुरातन ७०.नजर ७५.नवा ७६.तसा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 'दि केरला स्टोरी 2' चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर 28 मे रोजी झी सिनेमा वाहिनीवर

पुणे (दैनिक संध्या) : "आता ही कथा फक्त सांगितली जाणार नाही... तर ती अनुभवलीही जाणार आहे." देशभर चर्चेत राहिलेला आणि आपल्या प्रभावी कथनशैलीने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा 'दि केरला स्टोरी 2' आता झी सिनेमावर आपल्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरसाठी सज्ज आहे. सत्य घटनांवर आधारित हा चित्रपट समाजातील एका संवेदनशील विषयावर ठाम आणि प्रभावी दृष्टिकोन मांडतो. ही रोमहर्षक आणि विचार करायला लावणारी कथा पहा या गुरुवारी, 28 मे रोजी रात्री 8 वाजता फक्त झी सिनेमा वर. कामाख्या नारायण सिंग दिग्दर्शित आणि विपुल अमृतलाल शाह निर्मित या चित्रपटात उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा, अदिती भाटिया, सुमित गहलावत, अर्जन सिंह औजला, युक्तम खोसला आणि अलका अमीन यांनी भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या दमदार अभिनयासोबतच चित्रपटाच्या प्रभावी आणि ठाम कथनशैलीमुळे तो अलीकडच्या काळातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे. 'दि केरला स्टोरी 2' हा चित्रपट हे उलगडण्याचा प्रयत्न करतो की कसा प्रेमाचा वापर करून महिलांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला जाऊ शकतो. हा चित्रपट कुटुंबांसाठी एक व्यापक इशारा देतो. हा चित्रपट भारतातील विविध राज्यांतील तीन तरुणींची कथा मांडतो, ज्या खऱ्या प्रेमाच्या शोधात आपल्या कुटुंबाविरुद्ध जातात, पण पुढे फसवणूक, विश्वासघात आणि अत्याचारांच्या जाळ्यात त्या अडकतात. काय फार उशीर व्हायच्या आधी त्या ह्या भयानक परिस्थितीतून बाहेर पडू शकतील? पाहायला विसरू नका 'दि केरला स्टोरी 2' चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर या गुरुवारी 28 मे रोजी रात्री 8 वाजता झी सिनेमावर!

### नायका फॅशनकडून ईदसाठी आकर्षक आणि देखणे पेहराव पर्याय

पुणे (दैनिक संध्या) : नायका फॅशनच्या 'ईद-अल-अजहा विशेष संग्रहा'मुळे यंदाच्या ईद पेहरावाला हलकं, देखणं आणि आकर्षक रूप मिळालं आहे. ईदनिमित्त दिवसभर नातेवाईकांच्या भेटीगाठी, खास क्षण आणि छायाचित्रण यामुळे सणासुदीचा तसेच आरामदायी पोशाख निवडण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. यंदा फिकट गुलाबी, सौम्य हिरवा आणि गडद रत्नछटांतील रंग विशेष लोकप्रिय ठरत आहेत. हलके कापड, नाजूक भरतकाम आणि मोकळ्या आकारातील पोशाख यांना ग्राहकांकडून अधिक पसंती मिळत आहे. गजरा गँग, लिखा आणि सीरत यांसारख्या वस्त्रनिर्मिती संस्थांच्या साड्या, कुर्ता संच, घेरदार पोशाख तसेच जुळ्या पोशाखांच्या पर्यायांमध्ये आकर्षकता आणि आरामदायीपणाचा उत्तम समतोल दिसून येत आहे. सहज परिधान करता येणारे आणि दिवसभर आरामदायी वाटणारे हे पोशाख ईद उत्सवासाठी विशेष लक्ष वेधून घेत आहेत. पुरुषांसाठीही एकसंध रंगछटांतील कुर्ते आणि उठावदार बंदगळा पोशाख आकर्षण ठरत आहेत. पारंपरिकतेसोबत आधुनिकतेचा संगम साधणाऱ्या या शैलींना तरुणांकडून विशेष प्रतिसाद मिळत आहे. ईदचा सणासुदीचा देखावा अधिक खुलवण्यासाठी झुमके, मोत्यांच्या नक्षीकामाच्या छोट्या पिशव्या आणि कुंदन अलंकारांना मोठी मागणी आहे. पारंपरिक आणि आधुनिक शैलीचा सुंदर मिलाफ असलेला हा संग्रह यंदाच्या ईद साजरीकरणासाठी उत्तम पेहराव पर्याय ठरत आहे.

### अंतिम सामन्यांसाठी सोशल दुसरा स्टेडियमसह सज्ज

पुणे (दैनिक संध्या) : क्रिकेटचा सर्वात मोठा हंगाम अंतिम सामन्यापर्यंत पोहोचत असताना सोशल ने मॅच डे डेस्टीनेशनचा अनुभव देण्यासाठी दुसरास्टेडियम उपक्रम ग्राहकांसाठी पुन्हा आणला आहे. याअंतर्गत भारतभरातील विविध आउटलेट्स मध्ये चाहते मोठ्या स्क्रीनवर फायनलचा थरार अनुभवू शकतील. क्रिकेट-थीम डेकोर, जल्लोषमय वातावरण, सामन्याचा रोमांच आणि प्रत्येक चौकार, विकेट व शेवटच्या षटकातील थरार अधिक भव्य बनवणारा सामूहिक उत्साह यामुळे हा अनुभव अविस्मरणीय ठरणार आहे.याचबरोबर देशभरातील प्रसिद्ध प्रादेशिक चवींपासून प्रेरित खास मॅच-डे मेनूसह चाहत्यांसाठी अधिक रंगतदार अनुभव घेऊन आले आहे.या मेनूमध्ये अनेक लोकप्रिय पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये राजस्थान बॅलेस्टिक भजियाज,हैदराबाद ओजी हलिम बिर्याणी,लखनौ भारवान गलौटी,बंगळुरू ओजी स्टेडियम सामोसा,पंजाब सिक्सर छोले भटोरे,गुजरात फरसाण प्लॅटर,मुंबई वडा प्लॅटर,दिल्ली मॅच मोमोज,कोलकाता फिले-ओ-फिश बर्गर यासारख्या चविष्ट पदार्थांचा समावेश आहे.दुसरा स्टेडियम 2026 अनुभव हा पुणे,मुंबई,दिल्ली-एनसीआर,बंगळुरू,हैदराबाद,कोलकाता,लखनौ, चंदीगड आणि देहरादून मधील सोशल आऊटलेटसमध्ये मिळणार आहे.

# इंधन दरवाढीमुळे जनता त्रस्त सरकार मस्त






**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेवरून केंद्र सरकारने केलेल्या पेट्रोल व डिझेल दरवाढीच्या विरोधात पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसची दरवाढ रद्द करावी यासाठी आंदोलन करण्यात आले. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैलगाडा व टांगागाडी यावर बसून आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले की, "पश्चिम आशिया युध्दामुळे जागतिक बाजारातील कच्च्या इंधनाचे दर दररोज वाढत आहेत. त्यामुळे सार्वजनिक इंधन कंपन्यांनी इंधनाचे दर वाढविले. जागतिक बाजारात इंधनाचे दर कमी असताना पेट्रोल आणि डिझेलवर दररोज १ हजार कोटी रूपयांचा केंद्रीय कर लादूनही भाजप सरकारचे पोट भरलेले नाही. इंधनाचे दर कमी असताना भाजप सरकारने त्याचा लाभ जनतेला मिळवून दिला नाही. जेव्हा पेच प्रसंग उद्‌भवला तेव्हा भाजपचे नेतृत्व निवडणुकांमध्ये व्यस्त झाले. निवडणुका संपल्यानंतर ते त्यागाचा उपदेश देऊ लागले. त्यानंतर सातत्याने इंधन दरवाढ होत आहे. आज चौथ्यांदा इंधन दरवाढ करण्यात आली आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतातील दर कमी असल्याचे सरकार खोटे सांगत आहे. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढले आहे. त्यामुळे सामान्य जनता हवालदिल झाली आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी इंधनचा तुटवडा निर्माण झाला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे करण्यासाठी अडथळा येत आहे. निवडणुकीच्या काळामध्ये भारतीय जनता पार्टीने खर्चात कुठलीही काटकसर केली नाही आणि त्याचा भुर्दंड सर्वसामान्य जनतेला सोसावा लागत आहे. UPA सरकारच्या काळात कच्च्या इंधन तेलाचे भाव वाढलेले असताना सुध्दा जनतेचे हित लक्षात घेवून इंधन दरवाढ कमी प्रमाणात करण्यात आली. मोदी सरकारच्या काळात कच्च्या तेलाच्या निष्क्रीय आयात धोरणामुळे देशाला आर्थिक संकटातून जावे लागणार आहे. या कठिण परिस्थितीत सुध्दा केंद्र सरकारने तोडगा काढण्यासाठी सर्व पक्षिय बैठक बोलविली नाही, ही देशासाठी फार मोठी चिंतेची बाब आहे. काँग्रेस पक्ष सदैव जनतेच्या हितासाठी लढत आहे."

यानंतर पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दिप्तीताई चवधरी म्हणाल्या की, "पेट्रोल, डिझेल बरोबरच घरगुती गॅसची दरवाढ व नागरिकांना घरगुती गॅसचा पुरवठा कमी केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असून मोदी सरकारने महिलांच्या हितासाठी मते मागीतली परंतु महिलांवरील अत्याचार थांबले नाहीत त्याचबरोबर घरगुती गॅस सिलेंडर च्या कमतरतेमुळे घरगुती-

आर्थिक गणित कोलमडे असून याला जबाबदार केवळ आणि केवळ केंद्रातील मोदी सरकार आहे. महागाईमुळे जीवनावश्यक वस्तू महाग झाल्या असून सर्वसामान्य नागरिकांना घर चालविणे देखील कठिण झाले आहे. उत्पन्न वाढत नाही परंतु महागाई झपाट्याने वाढत आहे त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे.ज्यावेळेला जागतिक पातळीवर क्रुड ऑईलचे दर अत्यंत कमी होते त्यावेळी ७७ हजार कोटींचा नफा केंद्र सरकारने ऑईल कंपनीला मिळवून दिला मग आत्ता केंद्र सरकारने सबसिडी देवून सामान्य जनतेला दिलासा द्यावा."

यानंतर माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसेपाटील व माजी आमदार मोहन जोशी यांनी केंद्रसरकारवर पेट्रोल-डिझेल दरवाढी विरोधात टिका केली.

यावेळी महानगर पालिकेतील गटनेते चंदूशेठ कदम, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, शानी नौशाद, नगरसेवक दिपाली डोख, अश्विन लांडगे, सुनिल शिंदे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, सेवादलाचे लतेंद्र भिंगारे, इंटक अध्यक्ष चेतन आगरवाल, ज्येष्ठ नागरिक संघाचे द. स. पोळेकर, राजेंद्र भुतडा, रमेश अय्यर, सचिन आडेकर, रमेश सोनकांबळे, रवींद्र माझीरे, बाळासाहेब अमराळे, सुरेश कांबळे, पप्पु घोलप, राहुल जगताप, केविन मॅन्युल, गौरव बाळिंदे, हर्षद हांडे, सेल्वराज ॲथोनी, नितीन परतानी, आयुव पठाण, नरसिंह अंदोली, वैभव डांगमाळी, रवि आरडे, संदिप मोकाटे, राहुल वंजारी, ॲड. संतोष जाधव, मजहर मणियार, सागर धावडे, कान्हुभाऊ साळूंके, पांडुरंग गायकवाड, शिवाजी सोनार, सोमनाथ पवार, सुरेश तनपुरे, सचिन गोरड, अक्षय मराठे, सागर घारे, नवनाथ जोरी, निलेश खैरे, बाळा धायगुडे, सतिश मंगडे, प्राजक्ता जाधव, ज्योती अडागळे, अंजली सोलापूरे, कल्पना शिंदे, प्रवीणा तांबोळी आदीसह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आंदोलनात सहभागी झालेले माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील व माजी आमदार मोहन जोशी यांनी देखील केंद्र सरकारवर पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या विरोधात भाजपवर टिका केली. महापालिकेतील पक्षाचे गटनेते चंदू कदम, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, शानी नौशाद, नगरसेवक दिपाली डोख, अश्विन लांडगे, सुनिल शिंदे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, सेवादलाचे लतेंद्र भिंगारे, इंटक अध्यक्ष चेतन आगरवाल, ज्येष्ठ नागरिक संघाचे द. स. पोळेकर, राजेंद्र भुतडा, रमेश अय्यर, सचिन आडेकर, रमेश सोनकांबळे, रवींद्र माझीरे, बाळासाहेब अमराळे, सुरेश कांबळे, यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यात 'वंदे भारत'च्या अपघाताचं कारण आलं समोर

**पुणे (दै. संध्या)**

संरक्षक रुळात (गार्ड रेल) अधिक अंतर राहिल्याने वंदे भारत एक्स्प्रेसचा पुणे स्थानकाच्या यार्डमध्ये अपघात झाल्याचा अहवाल मध्य रेल्वेच्या चौकशी समितीने दिला आहे. अभियांत्रिकीची चूक झाली असल्याचे वृत्त 'सकाळ'ने ३ मे रोजी प्रसिद्ध केले होते. ते आता खरे ठरले आहे. या प्रकरणातील दोषींवर लवकरच कारवाई होणार असल्याचे सांगण्यात आले.

मुंबईहून सोलापूरला जाणाऱ्या 'वंदे भारत एक्स्प्रेस'चा २७ एप्रिलला पुणे स्थानकाच्या यार्डमध्ये अपघात झाला. हा 'वंदे भारत'चा देशातील पहिला अपघात ठरला. रेल्वे प्रशासनाने अपघाताचे कारण शोधण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली. या समितीने प्रारंभिक अहवाल दिला असून, यात ब्लॉकच्या काळात अभियांत्रिकी विभागाकडून चूक झाल्यानेच डब्याचे पुढचे चाक घसरून अपघात झाला असल्याचे म्हटले आहे.

पुणे स्थानकाच्या यार्डमधील डायमंड क्रॉसिंग जवळच्या दोन रुळांमध्ये अंतर वाढल्याने चाकाचे नियंत्रण बिघडले. सुदैवाने या वेळी रेल्वेचा वेग ताशी १० किलोमीटर होता. या वेळी रेल्वेचा वेग जास्त असता, तर अपघाताची तीव्रता वाढली असती.



मुख्य रूळांच्या समांतर आणि काही अंतरापर्यंत जे अतिरिक्त रूळ बसवले जातात, त्यांना गार्ड रेल म्हणतात. ते मुख्य रूळांपेक्षा थोडे वेगळे असतात आणि त्यांचा उद्देश गाडीला वेग देणे नसून, सुरक्षितता राखणे हा असतो. रेल्वेचे चाक मुख्य रूळावरून घसरले, तर गार्ड रेलमुळे घसरलेले चाक या दोन रूळांच्या मध्येच अडकून राहते. मोठा अपघात होत नाही.

**वंदे भारत एक्सप्रेसच्या अपघाताचा प्रारंभिक अहवाल प्राप्त झाला आहे. यात अभियांत्रिकी विभागाच्या चुकीमुळे अपघात झाला असल्याचे म्हटले आहे. अपघाताचा अंतिम अहवाल प्राप्त झालेला नाही.**

**- डॉ. स्वप्नील नीला,**
**मुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**मध्य रेल्वे, मुंबई**

## एमआरपी विरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे सविनय सत्याग्रह आंदोलन

*पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन; पंचायतीच्या वतीने आज सर्व देशभर आंदोलने*

**पुणे (दै. संध्या)**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे एमआरपी (Maximum Retail Price) व्यवस्थेतील अपारदर्शकता व ग्राहकांच्या आर्थिक शोषणाविरोधात सविनय सत्याग्रह आंदोलन व निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब सिताराम औटी, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सूर्यकांत पाठक , केंद्रीय कार्यकारी सदस्य विजय सागर, ज्ञानेश्वर उंडे यांनी केले.

यावेळी बाळासाहेब औटी यांनी आपल्या भाषणात एमआरपी व्यवस्थेच्या नावाखाली ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप केला. उत्पादन खर्च अत्यल्प असताना अनेक पटीने जास्त एमआरपी छापून ग्राहकांची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्याग्रह आंदोलनाला पुणे येथे जिल्हाधिकारी कार्यालय महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बाळासाहेब औटी, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य, सूर्यकांत पाठक, केंद्रीय कारखाने सदस्य विजय सागर, विलास लेले, प्रांत स कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडे, विधी आयाम प्रमुख




श्रीकांत जोशी, ,जिल्हा सचिव अशोक भोर , जगन्नाथ खोकराळे, देवीदास काळे, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते .

डिस्काऊंट, ऑफर, सेल या नावाखाली ग्राहकांची मानसिक फसवणूक होत असून सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी १९७६ च्या "Standards of Weights and Measures Act", १९९१ नंतरच्या उदारीकरण-जागतिकीकरण धोरणांचा परिणाम, २००९ चा "Legal Metrology Act" आणि २०११ च्या "Packaged Commodities Rules" यांचा संदर्भ देत विद्यमान कायद्यातील त्रुटींवर प्रकाश टाकला. ग्राहकांना वस्तूची खरी उत्पादन किंमत माहिती नसल्याने बाजारातील पारदर्शकता संपुष्टात गेल्याचे त्यांनी नमूद केले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने आज सर्व देशभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले गेले. आंदोलनाच्या निमित्ताने अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य सूर्यकांत पाठक यांच्यावतीने पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या :

प्रत्येक वस्तूवर एमआरपी सोबत उत्पादन खर्च जाहीर करणे बंधनकारक करावे. उत्पादकाने पहिल्या वितरकाला दिलेली "प्रथम विक्री किंमत" वस्तूंवर नमूद करावी. खोट्या सवलती व दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणावी. मनमानी एमआरपीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र सक्षम प्राधिकरण स्थापन करावे. ग्राहकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी

यावेळी पंतप्रधान, केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री यांच्या नावे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सादर करण्यात आले. निवेदन उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी स्वीकारले. आंदोलनात पुणे जिल्ह्यासह विविध तालुक्यांतील ग्राहक पंचायत पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, युवक व ग्राहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलन शांततामय, संविधानिक व सविनय मार्गाने पार पडले. "उत्पादन खर्च जाहीर करा", "एमआरपीच्या नावाखालील आर्थिक लूट बंद करा", "ग्राहकांना न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

ग्राहकांना सवलतीच्या नावाखाली फसवणारी एमआरपी व्यवस्था आता बदललीच पाहिजे. वस्तूची उत्पादन किंमत आणि नफ्याची पारदर्शक माहिती ग्राहकांसमोर आली, तरच बाजार व्यवस्थेतील अन्याय थांबेल. ग्राहकांच्या आर्थिक हक्कासाठीचा हा लढा आता जन आंदोलनाच्या टप्प्यावर पोहोचला आहे.

# चला ! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेवूया !

कारण संकटे येत राहतात... पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे. तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवूया ! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया !




ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला " ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी-महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. 'जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा' हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबाजवणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे.

बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे.

माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ओबेन इलेक्ट्रिकच्या महाराष्ट्र विस्ताराला वाढती मागणी; 25 शोरूमचे लक्ष्य

पुणे (दैनिक संध्या) : या भारतातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या संशोधन व विकास (R&D) आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने महाराष्ट्रातील विस्ताराला गती दिली आहे. कंपनीच्या नव्या Rorr Evoमोटरसायकलला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला असून, लाँचनंतर अवघ्या १५ दिवसांत २५ हजार बुकिंग झाल्या आहेत. यी पार्श्वभूमीवर कंपनीने आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत महाराष्ट्रात २५ शोरूम सुरू करण्याची योजना आखली आहे. यामुळे ग्राहकांना इलेक्ट्रिक मोटरसायकल, सेवा सुविधा मिळणार आहेत. कंपनीने पुण्यातील शिवाजीनगर शोरूममध्ये Rorr Evo चे महाराष्ट्रासाठी प्रादेशिक सादरीकरण केले. पुणे हे कंपनीसाठी देशातील सर्वाधिक प्रतिसाद देणाऱ्या बाजारपेठांपैकी एक असल्याचे कंपनीने नमूद केले. सध्या ओबेन इलेक्ट्रिकची महाराष्ट्रात ११ शोरूम्स कार्यरत असून, त्यापैकी पुण्यात वाकड, शिवाजीनगर, अरण्येश्वर आणि चिंचवड येथे चार शोरूम्स आहेत. याशिवाय छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, नागपूर, बार्शी, सोलापूर आणि अहमदपूर येथेही आउटलेट्स आहेत. कंपनी आर्थिक वर्ष २०२७ अखेरपर्यंत महाराष्ट्रात आणखी १४ नवीन शोरूम्स सुरू करणार आहे. उच्च कार्यक्षमतेच्या इलेक्ट्रिक मोटरसायकल्सची वाढती मागणी आणि वेगाने होणारा ईव्ही स्वीकार यामुळे हा विस्तार केला जात आहे. महाराष्ट्रातील एकूण Rorr Evo विक्रीपैकी जवळपास २५ टक्के विक्री पुण्यातून होईल, असा अंदाज कंपनीने व्यक्त केला आहे. नव्या Rorr Evo ला मिळालेला प्रतिसाद हा भारतातील इलेक्ट्रिक मोटरसायकल क्षेत्रातील सर्वात वेगवान सुरुवातीच्या बुकिंग्सपैकी एक मानला जात आहे. या मोटरसायकलची डिलिव्हरी जून २०२६ पासून सुरू होणार असून ग्राहकांना अद्याप ऑनलाइन पेमेंट पोर्टलद्वारे ₹९९,९९९ (एक्स-शोरूम) या प्रारंभिक किमतीचा लाभ घेता येणार आहे. कंपनीच्या विस्ताराबाबत बोलताना मधुमिता अगरवाल म्हणाल्या, “महाराष्ट्र प्रीमियम इलेक्ट्रिक मोटरसायकल्ससाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ म्हणून उदयास आले आहे. ग्राहकांमध्ये वाढती जागरूकता, ईव्ही स्वीकार आणि उच्च कार्यक्षमतेच्या मोबिलिटी सोल्यूशन्सची वाढती पसंती यामुळे हा बदल होत आहे. Oben Rorr Evo ला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून बाजारातील दीर्घकालीन वाढीबाबत आमचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे. पुण्यावर विशेष लक्ष केंद्रित करत महाराष्ट्रातील विस्ताराद्वारे आम्ही उच्च कार्यक्षमतेच्या इलेक्ट्रिक मोटरसायकल्स अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवू इच्छितो. तसेच शहरी आणि उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये मजबूत सेवा आणि मालकी नेटवर्क उभारून दीर्घकालीन ईव्ही स्वीकाराला चालना देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.”

### ग्रामीण महाराष्ट्रात इंडियन ऑइलकडून अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये हंगामी स्वरूपात इंधनाच्या मागणीत होत असलेल्या वाढीदरम्यान इंडियनऑइलकडून पेट्रोल (एमएस),डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा कायम ठेवण्यात येत आहे. अलिकडच्या काही दिवसांत महाराष्ट्रभर पेट्रोलियम उत्पादनांच्या उठावामध्ये इंडियनऑइलने लक्षणीय वाढ नोंदवली आहे. 1 ते 25 मे 2026 या कालावधीत पेट्रोल (एमएस) रिटेल विक्रीमध्ये वर्षानुवर्षे 22 टक्के वाढ नोंदवली गेली असून, त्याच कालावधीत डिझेल (एचएसडी) रिटेल विक्रीमध्ये 33 टक्क्यांची वाढ झाली आहे, जी वाढलेल्या हंगामी मागणीचे प्रतिबिंब आहे. सध्या डिझेलच्या मागणीत होत असलेली वाढ प्रामुख्याने महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या शेतीविषयक कामांमुळे आहे, जिथे शेतकरी आगामी पेरणी हंगामासाठी शेतांची तयारी करत आहेत. कृषी तसेच घरगुती गरजांसाठी अखंड इंधन उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी इंडियनऑइलकडून लॉजिस्टिक्स आणि पुरवठा व्यवस्थापनाचे काटेकोर समन्वय करण्यात येत आहे. नागपूर,जालना,बुलढाणा,अकोला,वाशीम आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील शेतकरी आणि ग्राहकांनी इंडियनऑइलच्या रिटेल आऊटलेट्सवर डिझेलची सुरळीत उपलब्धता आणि अखंड सेवांबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत. जालन्यातील एका शेतकऱ्याने सांगितले, “शेतीच्या कामांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा काळ आहे आणि ट्रॅक्टर तसेच शेत तयारीसाठी आम्हाला नियमित डिझेलची आवश्यकता असते. इंडियनऑइल पंपांवर आम्हाला कोणत्याही अडचणीशिवाय इंधन मिळत आहे.” वाशीममधील एका ग्राहकाने सांगितले, “आमच्या गावाजवळील इंडियनऑइल रिटेल आऊटलेटवर डिझेल सहज उपलब्ध होत आहे, ज्यामुळे या व्यस्त शेती हंगामात शेतकऱ्यांना मोठा आधार मिळत आहे.” इंडियनऑइलने ग्राहकांना पुन्हा आश्वस्त केले आहे की देशभरात पेट्रोल,डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी नेहमीप्रमाणेच खरेदी व्यवहार सुरू ठेवावेत, घाबरून जाऊन अतिरिक्त खरेदी टाळावी आणि इंधन उपलब्धतेबाबत अचूक माहितीसाठी केवळ इंडियनऑइल आणि त्यांच्या अधिकृत संस्थांकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितींवर विश्वास ठेवावा.

# डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिली मुंबईकरांना तंबाखूमुक्तीची शपथ

**मुंबई (दै. संध्या) :**



"जागतिक तंबाखू विरोधी दिन" निमित्ताने सामाजिक न्याय विभाग व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २६ मे २०२६ रोजी या प्रचार कार्यक्रमाचे आयोजन मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात करण्यात आले होते.

याप्रसंगी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याण विभागाचे आयुक्त दिपा मुधोळ यांच्या हस्ते सदर भव्य व्यसनमुक्ती पोस्टर्स प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुंबईकरांना संदेश दिला की, ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिन या दिवसाचे महत्त्व आज मोठ्या स्वरुपात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला आहे की, जर तंबाखूचे व्यसन थांबविले नाही तर सन २०२०ते २०३० पर्यंत जगातील सुमारे शंभर कोटी लोक तंबाखू पासून होणाऱ्या रोगांमुळे मृत्यू पावतील. त्यामध्ये २० ते ३० वर्षे वयोगटातील ४० टक्के लोक असू शकतात. म्हणून या आयोजनात सर्वांनी सहभागी होऊन स्वतःला तंबाखू पासून दूर ठेवण्याची शपथ उपस्थित आधिकारी व कर्मचारी यांना व्यसनमुक्तीची शपथ त्यांनी दिली.महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे ज्यांनी २०११ साली व्यसनमुक्तीचे धोरण बनविले आहे. महाराष्ट्र सरकारने या निमित्ताने व्यसनमुक्त महाराष्ट्र च्या दिशेने पाऊल उचलावे असे आवाहन नशाबंदी मंडळाचे चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी केले. तसेच येणाऱ्या वर्षात शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल्स, धार्मिक स्थळे यांच्या १०० मीटर पासून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंद व्हावी या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती कायदा अंमलबजावणीची मोहीम नगरपालिका, नगरपरिषद यामध्ये मोहीम राबविण्यात येईल अशी माहिती मंडळाच्या वतीने चिटणीस/ मुख्य संघटक अमोल स. भा. मडामे यांनी दिली. समाजकल्याण विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते कल्याणयात्रा- व्यसनमुक्तीच्या गाथा या मासिकाच्या मे २०२६ या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आयुक्त दिपा मुधोळ - मुंडे यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीच्या पोस्टर्स चे प्रकाशन करण्यात आले तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते उपस्थिततांना तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे व सामाजिक विभागाचे आयुक्त दिपा मुधोळ यांनी स्टॉल ला भेट देऊन संस्थेचे स्वागत केले. ही प्रदर्शनी बघण्यासाठी येणारे कर्मचारी, अधिकारी व मुंबईकर यांचे लक्ष वेधुन घेऊन सर्वांना तंबाखूला नाही म्हणा असे संदेश देत होते. सदर कार्यक्रमाला नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सलाम मुंबई फाऊंडेशन, नरोत्तम सक्सेरिया फाऊंडेशन, सलाम बॉम्बे फाऊंडेशन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, के इ एम हॉस्पिटल, भरडावाडी हॉस्पिटल, मराठवाडा ग्रामीण विकास, अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, वाशी, प्रजापिता ब्रम्हकुमारीज, सपोर्ट संस्था मुंबई या संस्थांनी सहभाग घेऊन कार्यक्रमात पोस्टर प्रदर्शनीचे आयोजन करून व्यसनमुक्तीचा संदेश दिला. तंबाखूजन्य कायद्याची माहिती दर्शविणारे कटआऊट, प्रदर्शनी, पोस्टर्स, पत्रकांच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थ व विक्री कायदा २००३ चा प्रचार, प्रसार व अंमलबजावणीसाठी आयोजित या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी आपला सहभाग नोंदवत तंबाखू मतलब खल्लास तंबाखू मुक्त मुंबई महाराष्ट्र चा नारा देत तंबाखूजन्य पदार्थ पासून दूर राहण्याचा संकल्प केला.

## शॉप्सीची नवी झेप; कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित खरेदी मंच तयार

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या हायपरव्हॅल्यू ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्समध्ये गणल्या जाणाऱ्या शॉप्सी बाय फ्लिपकार्टने आज नवीन एआय-पॉवर्ड शॉप्सी ॲप सुरू करत असल्याची घोषणा केली. शॉप्सी प्लॅटफॉर्मचे रूपांतर आता ऑफर्सवर आधारित खरेदीच्या स्थळातून एका आकर्षक, बक्षिसे मिळवून देणाऱ्या गेमिफाइड अनुभवात करण्यात आले आहे. देशातील महानगरे व श्रेणी-२ शहरांत राहणाऱ्या व भारतातील ऑनलाइन खरेदीला नवीन आकार देणाऱ्या तरुण, महत्त्वाकांक्षी, मूल्याबाबत जागरूक अशा भविष्यकाळातील १०० दशलक्ष ग्राहकांना डोळ्यापुढे ठेवून प्लॅटफॉर्मला हे नवीन स्वरूप देण्यात आले आहे. तीन रचनात्मक बाबींमुळे भारतातील ई-कॉमर्स क्षेत्राचे स्वरूप बदलत चालले आहे: पहिला बदल म्हणझे नवीन ग्राहकांच्या वाढीमध्ये श्रेणी २+ शहरांचा वाटा ६५ टक्के* आहे; दुसरा बदल म्हणजे जेन झेड या समूहाच्या हवे ते शोधण्याच्या सवयी मुलभूतरित्या वेगळ्या आहेत आणि भारतातील ऑनलाइन ग्राहकांमध्ये या समूहाचा वाटा सुमारे निम्मा आहे; आणि तिसरा मुद्दा म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्म्समध्ये विश्वासाचा अभाव अजूनही आहेच.

शॉप्सीच्या नवीन ॲपकडे या तिन्ही बाबींवर तोडगा आहे: सामाजिक शोध, व्हिडिओ-लेड उत्पादन अनुभव, पर्सनलायझेशन आणि गेमीफाइड बक्षिसे हे सर्व एकत्र आणून हायपर-कनेक्टेड जेन झेड व पुढील १०० दशलक्ष भारतीय ग्राहकांसाठी अखंडित व अंत:प्रेरणाधारित प्रवास सुरू करणारा प्लॅटफॉर्म शॉप्सीने विकसित केला आहे. ग्राहक जेथे असतील तेथे हा प्लॅटफॉर्म त्यांच्यासाठी उपलब्ध आहे आणि व्यवहारापूर्वीच त्यांचा विश्वास जिंकण्याचे काम करत आहे.

या नव्याने घडवण्यात आलेल्या (इंजिनीअर करण्यात आलेल्या) ॲपच्या प्रत्येक भागाची रचना भारतातील ग्राहकांच्या खरेदीच्या सवयी लक्षात घेऊन करण्यात आली आहे, ग्राहक उत्पादने कशी शोधतात येथपासून ते त्यांना उत्पादने कशी दाखवली जातात येथपर्यंत सर्व रचना ग्राहकांच्या सोयीने करण्यात आली आहे. प्रोडक्ट पेजेसवर आकर्षक दृश्ये, प्रत्यक्ष ग्राहकांचे फोटो आणि ऑटोप्ले व्हिडिओ दिलेले आहेत, त्यामुळे ग्राहक ॲपला खिळून राहतात. एआय-पॉवर्ड शोध आणि पर्सनलायझेशन यांमुळे योग्य उत्पादन योग्य क्षणी योग्य ग्राहकाच्या समोर येते, ही उत्पादने ग्राहकाला दाखवताना प्रादेशिक बाबी तसेच स्थानिक शोधाचे नमुनेही समजून घेतले जातात. त्यामुळे प्रत्येक ग्राहकाला सरसकट अनुभव दिला जात नाही, तर प्रत्येकाला स्थानिक अनुभव मिळतो.

## आधुनिक व संस्कारयुक्त हॉस्टेलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे (दै. संध्या) :**



शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या जैन समाजातील विद्यार्थ्यांना सुरक्षित, संस्कारित आणि आधुनिक निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमृता सुनील गांधी आणि स्मृती श्रुतेश गांधी यांनी एक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत मागील वर्षी कोथरूड येथे सुमारे ७० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले अत्याधुनिक जैन बॉईज हॉस्टेल सुरू करण्यात आले असून त्यास विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे. आगामी शैक्षणिक वर्षासाठी या हॉस्टेलची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून महाराष्ट्र, राजस्थान, गुजरातसह देशभरातील जैन विद्यार्थ्यांना इथे प्रवेश घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना घरासारखे वातावरण, शिस्तबद्ध जीवनशैली, गुणवत्तापूर्ण भोजन व्यवस्था आणि अभ्यासासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थापकांनी भर दिला आहे. हॉस्टेलमध्ये एसी रूम्स, वाय-फाय, जिम, इंडोअर गेम्स यांसारख्या सुविधा उपलब्ध असून जैन संस्कारांनी समृद्ध सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले आहे.

## भारती एअरटेलने डीओटी पॅनेलसमोर ‘प्रायोरिटी पोस्टपेड’ सेवेचे समर्थन केले

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

■ नेट न्यूट्रॅलिटीचे उल्लंघन नसल्याचा दावा केला

भारती एअरटेलने दूरसंचार विभागाच्या (डीओटी) पॅनेलसमोर आपल्या नव्या “प्रायोरिटी पोस्टपेड” सेवेचे समर्थन करताना सांगितले की, 5जी नेटवर्क स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित ही सेवा नेट न्यूट्रॅलिटीच्या नियमांचे उल्लंघन करत नाही तसेच प्रीपेड ग्राहकांच्या सेवेच्या गुणवत्तेत कोणतीही घसरण होत नाही. दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान समितीने मागवलेल्या स्पष्टीकरणाला उत्तर देताना एअरटेलने सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 5जीच्या मुख्य वैशिष्ट्यांचा वापर करून सेवा देण्यास परवानगी न दिल्यास देशातील 6जीच्या क्षमतेला धोका निर्माण होईल. “प्रायोरिटी पोस्टपेड ही सेवा कंटेंट-न्यूट्रल पद्धतीने कार्यान्वित करण्यात आली असून ती ट्राय आणि डीओटीच्या विद्यमान नियमावलीशी पूर्णपणे सुसंगत आहे. कोणत्याही ॲप्लिकेशनसाठी ब्लॉकिंग, थ्रॉटलिंग, कंटेंट-विशिष्ट प्राधान्य, झिरो-रेटिंग किंवा विशेष वागणूक दिली जात नाही,” असे एअरटेलने म्हटले. एअरटेलने 19 मे रोजी “प्रायोरिटी पोस्टपेड” योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत गर्दीच्या बाजारपेठांमध्येही पोस्टपेड ग्राहकांना सातत्यपूर्ण इंटरनेट वेग मिळण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

“एअरटेल प्रायोरिटी फीचरमुळे प्रीपेड असो वा पोस्टपेड, कोणत्याही ग्राहकाच्या सेवेच्या गुणवत्तेत घट होत नाही,” असे कंपनीने म्हटले. कंपनीने सांगितले की, सध्या व्यस्त वेळांमध्ये 5जी क्षमतेचा एकूण वापर सुमारे 38 टक्के आहे. यापैकी पोस्टपेड ट्रॅफिकचा वाटा केवळ सुमारे 4 टक्के असून, प्रायोरिटी पोस्टपेडसाठी व्हर्च्युअल “टनल” (स्लाइस) सुरू केल्यानंतर तो सुमारे 6 टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो, असे कंपनीने म्हटले.

## ड्रीमे टेक्नॉलॉजीसोबत ख्रिस्तियानो रोनाल्डोची नवी जागतिक भागीदारी

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**




नाविन्यपूर्ण गृहउपकरणे आणि उत्कृष्ट घरगुती उपाय क्षेत्रातील जागतिक अग्रणी असलेल्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने, आज फुटबॉल क्षेत्रातील दिग्गज खळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डोसोबत एका ऐतिहासिक जागतिक भागीदारीची घोषणा केली. हे सहकार्य कंपनीच्या वाटचालीतील एक निर्णायक टप्पा ठरले असून, ज्यामध्ये जगातील सर्वात शिस्तबद्ध खेळाडूंपैकी एकाला तंत्रज्ञानातील परिपूर्णतेचा आणि गुणवत्तेतील सर्वोच्चतेचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या ब्रँडशी एकत्र आणले जाते. ही नियुक्ती, ड्रीमे च्या जागतिक ब्रँड उपस्थितीच्या धोरणात्मक उंचावण्याचे प्रतीक असून, ती कंपनीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सध्याच्या परिपक्वतेचे प्रतिबिंब आहे. जलद विस्तार आणि उच्च-गती मोटर तंत्रज्ञान व एआय-आधारित प्रणालींमधील सातत्यपूर्ण प्रगतीची अनेक वर्षे लोटल्यानंतर, ड्रीमे ने जागतिक स्तरावर एक आदर्श म्हणून आपले स्थान भक्कम केले आहे; आणि आता या प्रतिष्ठित भागीदारीमुळे त्यांचे हे स्थान अधिकच दृढ झाले आहे. ड्रीमे च्या विकासाचा हा एक स्वाभाविक परिपाक असून, उच्च-दर्जाच्या गृहउपयोगी उपकरणांच्या बाजारपेठेत खऱ्या अर्थाने जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यास आपण सज्ज आहोत, याचाच हा एक संकेत आहे.

ही युती मूल्यांमधील सखोल एकवाक्यतेवर आधारलेली आहे. आपल्या संबंधित क्षेत्रात, ख्रिस्तियानो रोनाल्डो हा अविचल आत्मशिस्त, चिकाटी आणि व्यावसायिक मर्यादा ओलांडण्याच्या कटिबद्धतेमुळे एक जागतिक आदर्श बनला आहे. हेच सिद्धांत, ड्रीमे च्या कॉर्पोरेट तत्त्वज्ञानाचा कणा आहेत: म्हणजेच शाश्वत दृष्टीकोन, तांत्रिक नेतृत्व आणि वापरकर्त्यांच्या अनुभवामध्ये सतत केली जाणारी सुधारणा यांवर लक्ष केंद्रित करणे.

या भागीदारीविषयी बोलताना ख्रिस्तियानो रोनाल्डो म्हणाला: "मी नेहमीच अशा भागीदारांच्या शोधात असतो, जे उत्कृष्टतेप्रतीचा माझा ध्यास आणि कठोर परिश्रमाप्रतीची माझी कटिबद्धता सामायिक करतात." ड्रीमे हा एक असा ब्रँड आहे, जो नवनवीन कल्पना राबवतो आणि उत्कृष्ट दर्जाची कामगिरी पार पाडतो, ज्यामुळे जीवन अधिक सुलभ आणि उत्तम बनते. ड्रीमे परिवारात सामील होण्यास आणि जागतिक बाजारपेठेत नेतृत्व करण्याच्या त्यांच्या ध्येयाला पाठिंबा देण्यास मी अत्यंत उत्सुक आहे." या भागीदारीचा गाभा म्हणून विकसित करण्यात आलेला ‘ड्रीमे टू विन’ हा उपक्रम, जागतिक दर्जाची विजेती मानसिकता आणि प्रगत नाविन्य यांचा सुरेख संगम दर्शवतो; तसेच, दैनंदिन दिनचर्येतच उत्कृष्टतेचे शिखर गाठण्यासाठी वापरकर्त्यांना सक्षम करणारे एक शक्तिशाली साधन म्हणून उत्कृष्ट राहणीमानाची नव्याने व्याख्या करतो.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांची पूर्तता भारत जागतिक शक्ती म्हणून उदयास

**पुणे (दै. संध्या) :**



देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले. देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज मुंबईतील प्रभादेवी स्थित रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या सोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार सुनील राणे उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, मोदींजींनी मागील 12 वर्षांत केलेले कार्य खूप मोठे आहे. एका पुस्तकात ते कार्य मांडणे खूप कठीण काम आहे. देशातील तळागाळातील शेवटच्या माणसाला सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी मोदींजींनी सतत प्रयत्न केले. हर घर शौचालय, उज्वला गॅस योजना यांसारख्या योजना त्यांनी राबवल्या. सरकारच्या अनुदानावर जनतेला न ठेवता गरीब केंद्रित अजेंडा त्यांनी राबवला. त्याचाच परिणाम म्हणून मागील 10 वर्षांत 25 कोटी जनतेला गरिबीतून बाहेर काढण्यात सरकारला यश आले. भारताचा GDP 2013-14 मध्ये 103 लाख कोटी होता तो 2025-26 मध्ये 357 लाख कोटींपर्यंत म्हणजेच तिप्पट वाढवला. महाराष्ट्राचा GDP 2013-14 मध्ये 13 लाख कोटी इतका होता तो 2025-26 पर्यंत 54 लाख कोटी इतका वाढवला. हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. पंतप्रधान मोदीजींचे 12 वर्षांत केलेला देशाचा विकास हा फक्त घोषणांनी झालेला नाही, तर त्यामागे त्यांची विकासाभिमुख नियोजनबद्ध रणनीती हे मुख्य कारण आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत भारताने केवळ विकास केला नाही, तर जगासमोर एका नव्या राष्ट्रशक्तीचा आदर्श उभा केला आहे. आजचा भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा, डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम झालेला, उद्योगशील आणि नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारा समर्थ राष्ट्र म्हणून जगभरात ओळखला जात आहे, असे गौरवोद्गार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी “राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती”या विशेष संग्राह्य अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात काढले. “राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती” म्हणजे खरंतर देशाच्या जनतेने अनुभवलेला परिवर्तनाचा इतिहास आहे, असे सांगत रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, गेल्या एका तपामध्ये सामान्य माणसाच्या आयुष्यात घडलेला बदल प्रत्येक भारतीयाने अनुभवला आहे. शेतकरी, कामगार, गरीब, वंचित आणि उपेक्षितांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था मोदी सरकारने निर्माण केली.

पारदर्शक शासनपद्धतीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला. देशातील गरीबांच्या घरात उजेड, महिलांच्या आयुष्यात सन्मान, युवकांच्या हातात संधी आणि सामान्य नागरिकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. “एक भारत, अखंड भारत”ते “विकसित भारत”या प्रवासातील परिवर्तनाची १२ विषयांवरील तथ्यपूर्ण मांडणी या विशेष अंकातून करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या विशेष संग्राह्य अंकामध्ये अखंड भारत, अंत्योदय, सुरक्षित भारत, युवा भारत, मातृप्रधान भारत अशा विषयांपासून विज्ञान, उद्योग आणि विकसित भारत २०४७ यावर विशेष प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. भारताने जागतिक स्तरावर निर्माण केलेला प्रभाव, सीमांवर शत्रूला दिलेले सडेतोड उत्तर आणि जगातील संकटसमयी मानवतेसाठी धावून जाणारा संवेदनशील भारत यांचेही या अंकात दस्तावेजीकरण करण्यात आले आहे. “राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती” हा केवळ स्मरणिका नसून नव्या भारताच्या परिवर्तनाचा साक्षीदार ठरणारा ऐतिहासिक दस्तावेज असल्याचे रविंद्र चव्हाण यांनी नमूद केले.


## सार्वजनिक सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, माझे अशील [श्री. संतोष महादेव सैद] यांच्याकडून खालीलप्रमाणे वर्णन केलेली स्थावर मालमत्ता खरेदी करण्याच्या प्रक्रियेत आहेत.

**मालमत्तेचे वर्णन**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत, ता.- हवेली -१६ मौजे - धायरी भाग सर्व्हे नंबर ११-- ग्रामपंचायत हद्दीतील गाव मौजे धायरी येथील स.न. ११/३/२/५ यांसी क्षेत्र ३हे.५० आर यावर बांधकाम सुरू केलेल्या ओम साई पार्क या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक.९ यांसी बिलटप क्षेत्र ४८२ चौ.फुट म्हणजेच ४४.७९ चौ.मी. अधिक स्वतंत्र बाल्कनी क्षेत्र ५७ चौ.फुट म्हणजेच ५.२९ चौ.मी. तसेच संबंधित जमिनीतील प्रमाणानुसार अविभाजित हिस्सा यासह असलेली सदर स्थावर मालमत्ता.

सदर मालमत्ता ही श्री. संतोष महादेव सैद यांच्या मालकीची व ताब्यात असल्याचा दावा करण्यात आलेला आहे.

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही संस्थेचा कोणताही हक्क, मालकी हक्क, स्वारस्य, दावा, मागणी, धारणाधिकार (Lien), बोजा, गहाण, वारसा हक्क, भाडेकरार हक्क, सुलभाधिकार (Easement) किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून 07 (सात) दिवसांच्या आत त्यासंबंधीचे लेखी निवेदन व पुरावे खाली सही करणाऱ्यांकडे सादर करावेत.

निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा हरकत प्राप्त न झाल्यास, कोणाचाही दावा किंवा हरकत नाही असे गृहित धरून माझे अशील विक्रीखताची अंमलबजावणी करतील व त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

**दिनांक : २६/०५/२०२६**
**ठिकाण : पुणे**

**(खरेदीदारांचे वकील)**
**ॲड. रचना दीपक क्षीरसागर**
**बी.एस.एल. एलएलबी, ॲड व नोटरी**
**ऑफिस:- सावित्री कॉम्प्लेक्स, दुकान क्र. 14,**
**उंबऱ्या गणपती चौक, डी.एस.के. रोड,**
**धायरीगाव, पुणे - ४११०४१**
**मो. ८६२६०८२२१०**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### योग ही आपल्याला मिळालेली देणगी - निफाडकर

पिंपरी (दैनिक संध्या) : योग ही आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी आपल्याला दिलेली देणगी आहे. नियमित योगसाधनामुळे आपले शारीरिक- मानसिक आरोग्य उत्तम राहून आनंदी जीवन जगता येते. म्हणूनच नियमित योगाभ्यास ही जीवनावश्यक गरज आहे. नियमित योग केल्यास आपल्याला आजारी पडण्याची वेळच येत नाही. अर्थातच योग साधनेमुळे अनेक आजार नक्कीच नियंत्रणात येतात. तसा उल्लेखही हठयोग आणि पतंजलीयोग या ग्रंथांमध्ये आहेच. आज घराघरात औषध पाण्यावर पाण्यासारखा पैसा खर्च होतो आहे. योगसाधना करण्यास मात्र काहीही खर्च येत नाही, तसेच योगाचे औषधांसारखे दुष्परिणाम होत नाहीत. असे उदगार योगाचार्य प्रमोद निफाडकर यांनी केले. योग विद्या धाम पिंपरी चिंचवडच्या वतीने ओझर्डे इन्स्टिट्यूट, गड सोसायटी,म्हाळसाकांत चौक, निगडी प्राधिकरण येथे योग केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, राजेंद्र बाबर, नायब तहसीलदार अमोल पाटील, ओझर्डे इन्स्टिट्यूटचे संचालक भूषण ओझर्डे, जिल्हा परिषदेचे वित्त अधिकारी बी. बी. गायकवाड, दीपाली ओझर्डे आदी मान्यवर उपस्थित होते. नागरिकांच्या आरोग्यासाठी संस्थेने योग केंद्रात स. सहा ते दहा व सायं चार ते आठ नियमित योग शिबिरे होणार आहेत. विविध योगशिबिरे, तसेच उत्तम आरोग्य आणि तरुणांना करिअरसाठी आयुष मंत्रालय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुद्धा आयोजित केले जाणार आहेत. संस्थेच्या योग शिक्षिका कल्पना सुतार आणि वासंती जाधव यांच्या सहकाऱ्यांनी आणि लहान विद्यार्थ्यांनी योगासनांची आकर्षक प्रात्यक्षिके सादर केली. ओमकार गोसावी आणि ऐश्वर्या जोशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण महादर, मल्लिकार्जुन उडगी यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. संगीता कळमकर यांनी आभार प्रदर्शन केले.

### पदाचा, लेटरहेडचा गैरवापर केल्यास हकालपट्टी : खासदार श्रीरंग बारणे



पिंपरी (दैनिक संध्या) : शिवसेनेच्या पदाचा, लेटरहेडचा गैरवापर करून नागरिकांना जाणीवपूर्वक त्रास दिल्यास पक्षातून हकालपट्टी करण्याचा इशारा शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी पदाधिकाऱ्यांना दिला आहे. खासदार बारणे म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे चोवीस तास काम करीत आहेत. त्यांच्यावर राज्यातील जनतेचा मोठा विश्वास आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. काही पदाधिकारी पदाचा, पक्षाचे चिन्ह असलेल्या लेटरहेडचा गैरवापर करतात. लेटरहेडवरुन पत्रे देऊन, माहितीचा अधिकार वापरून नागरिकांना त्रास देण्याच्या हेतूने अधिकाऱ्यांना पत्रे दिली जात आहेत. याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी पदाचा गैरवापर करू नये. शिवसेनेचा कोणता कार्यकर्ता नागरिकांना जाणीवपूर्वक त्रास देत असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा. अशा कार्यकर्त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात येईल. पदाचा गैरवापर करणाऱ्यांची यापूर्वी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे.



### सावली निवारा वृद्धाश्रमाला वुई टुगेदर फाउंडेशनकडून मदतीचा हात

पिंपरी (दैनिक संध्या) : सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या वुई टुगेदर फाउंडेशन यांच्या वतीने पिंपरी येथील सावली निवारा वृद्धाश्रम येथे वृद्ध महिला व पुरुषांसाठी मदत उपक्रम आयोजित करण्यात आला. वुई टुगेदर फाउंडेशन हे गोरगरीब, सर्वसामान्य, वंचित, निराधार, अंध, अपंग, गरीब विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच दुर्गम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सातत्याने कार्य करत आहे. समाजातील गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवत असताना यावेळी फाउंडेशनच्या वतीने सावली निवारा वृद्धाश्रमातील वृद्धांना कपडे, प्रथमोपचार पेटी, अत्यावश्यक औषधे तसेच खाऊ वाटप करण्यात आले. सावली निवारा वृद्धाश्रमामध्ये शहरातील विविध भागांतील निराधार वृद्धांचे निशुल्क संगोपन केले जाते. त्यामुळे या आश्रमाला कायम मदतीची आवश्यकता भासत असते. ही गरज लक्षात घेऊन वुई टुगेदर फाउंडेशनने मदतीचा हात पुढे केला. फाउंडेशनचे अध्यक्ष मधुकर बच्चे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

# जनगणना प्रक्रियेत दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करा

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी : माहिती संकलन आणि नोंदींच्या अचूकतेसाठी दक्षता घेण्याचे दिले निर्देश

**पिंपरी (दै. संध्या)**

जनगणना ही अत्यंत महत्त्वाची आणि कालमर्यादित प्रक्रिया असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा, टाळाटाळ किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. ही प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. जनगणनेदरम्यान माहिती संकलन, नोंदींची अचूकता आणि प्रशासकीय कामकाजामध्ये दक्षता बाळगावी. या कामामध्ये दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करा, असे निर्देश आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या गृहसूची व गृहनिर्माण जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, मनोज सेठिया, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांच्यासह उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, व्यंकटेश दुर्वास, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सरगर, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पूजा दुधनाळे, मुकेश कोळप आदी उपस्थित होते.




> जनगणना प्रक्रियेमध्ये अचूक माहिती संकलन आणि वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रगणक, पर्यवेक्षक आणि संबंधित विभागांनी समन्वय राखून नागरिकांशी प्रभावी संवाद साधत ही प्रक्रिया सुरळीत पूर्ण करावी. प्रत्येक नोंद विश्वसनीय आणि त्रुटीविरहित राहण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने देखरेख आणि मार्गदर्शन केले जात आहे.
>
> **— सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

जनगणनेसाठी माहिती संकलन करताना प्रत्येक नोंद अचूक राहील याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच प्रशासकीय बाबींमध्ये दक्षता आणि शिस्त राखण्यावर भर द्यावा. याशिवाय, जनगणना ही केवळ नियमित शासकीय प्रक्रिया नसून भविष्यातील विकास आराखडे, नागरी सुविधा आणि धोरणनिर्मितीसाठी आधारभूत माहिती उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी नमूद केले. या बैठकीत उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी जनगणना प्रक्रियेमध्ये क्षेत्रीय पातळीवरील समन्वय, प्रगणकांना आवश्यक सहकार्य करून नागरिकांनी अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, तसेच प्रगणक आणि पर्यवेक्षकांनी माहिती संकलन करताना काटेकोरपणे नियमांचे पालन करावे, असे देखील नमूद केले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मोठा निर्णय; परदेश दौरे रद्द

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभ्यास, प्रशिक्षण किंवा शासकीय कामकाजासाठी मंजूर असलेले परदेश दौरे रद्द करण्यात आले आहेत. नवीन परदेश दौऱ्याचे नियोजन करण्यात येऊ नये. असे कठोर निर्णय महापलिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतले आहेत. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे तसेच, इंधन संकटामुळे महाराष्ट्र शासनाने सर्व महापालिकांना ऊर्जा बचत, इंधन वापर नियंत्रण, खर्च नियंत्रण व कार्यपद्धती संदर्भातील उपाययोजना राबविण्याचे आदेश 13 मे 2026 च्या पत्रानुसार दिले आहेत. त्यानुसार, आयुक्तांनी काटकसर करण्यासाठी वरील निर्णय घेतले आहेत. तो निर्णय सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू होणार आहेत. सर्व कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणेचे तापमान 24 ते 26 अंश सेल्सिअस दरम्यान ठेवण्यात यावे. महापालिकेचे कॅन्टीन, रुग्णालये, वसतीगृह, बालवाडी, अंगणवाडी तसेच, इतर भोजन व्यवस्थांमध्ये खाद्यतेलाचा नियंत्रित व संतुलित वापर करावा.



## विकासाच्या नावाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये बेसुमार वृक्षतोड

**पिंपरी (दै. संध्या)**

यंदाच्या तीव्र उन्हाळ्यात पिंपरी-चिंचवड शहरातील तापमानाने उच्चांक गाठल्याने नागरिक अक्षरशः होरपळून निघत आहेत. वाढते शहरीकरण, रस्ते रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, विविध विकासकामे आणि सततच्या खोदकामांमुळे शहरातील हिरवळ झपाट्याने कमी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. विकासाच्या नावाखाली मागील सहा वर्षांत तब्बल २१ हजार ३३८ झाडांची अधिकृत कत्तल करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिकेने मागील सात वर्षांत ९ लाख ६४ हजार ११७ झाडांचे रोपण केल्याचा दावा केला असला, तरी त्यापैकी प्रत्यक्षात किती झाडे जिवंत आहेत, याची स्पष्ट माहिती उद्यान विभागाकडे उपलब्ध नाही. विशेष म्हणजे २०१९ मध्ये करण्यात आलेल्या वृक्षगणनेचा अहवालही अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे महापालिकेच्या वृक्षलागवडीच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरवर्षी सुमारे सव्वा लाख झाडांची लागवड केली जात असली, तरी दुसरीकडे परवानगीने आणि विनापरवाना हजारो झाडांची तोड सुरूच असल्याने शहराची नैसर्गिक हिरवाई नष्ट होत चालली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार शहरात सध्या ३२ लाख १६ हजार ७९९ झाडे असल्याचा दावा केला जातोय. मात्र त्यातील किती झाडे प्रत्यक्षात अस्तित्वात आणि जिवंत आहेत, याची ठोस माहिती उपलब्ध नाही. पर्यावरणप्रेमींनी विदेशी वृक्षांच्या वाढत्या प्रमाणाबाबतही चिंता व्यक्त केली आहे. शहरात पिंपळ, वड, चिंच यांसारख्या देशी वृक्षांऐवजी गुलमोहर, निलगिरी, रेन ट्री यांसारख्या विदेशी झाडांची संख्या वाढत आहे. ही झाडे जमिनीतील पाणी मोठ्या प्रमाणात शोषून घेतात तसेच वादळी पाऊस किंवा वाऱ्यात सहज उन्मळून पडतात.



**सहा वर्षांत २१ हजार झाडांची कत्तल**

## पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून ऊर्जा बचत व खर्च नियंत्रणासाठी उपाययोजना लागू

### *ई-वाहन वापर, कारपूलिंग, ऑनलाइन कामकाज आणि पीएनजी वापरावर भर देण्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या सूचना*

**पिंपरी (दै. संध्या)**

पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने ऊर्जा बचत, इंधन वापर नियंत्रण, खर्च नियंत्रण तसेच कार्यपद्धतीमध्ये आवश्यक बदल करण्यासंदर्भात जारी केलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांसाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महत्वाच्या सूचना दिल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभ्यास, प्रशिक्षण अथवा शासकीय कामकाजासाठी मंजूर असलेले परदेश दौरे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येणार असून नवीन परदेश दौऱ्यांचे नियोजन टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये शक्य त्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच कार्यालयीन कामकाजासाठी नियोजित स्थळभेटी, पाहण्या व तपासणी दौरे यामध्ये कमीत कमी वाहनांचा वापर करून योग्य नियोजन करण्यावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे संयुक्त दौरे नियोजित करताना कारपूलिंग पद्धतीचा अवलंब करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून इंधन बचतीसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. दौरे अपरिहार्य असल्यास मेट्रो, रेल्वे, पीएमपीएमएल बस अथवा इतर सार्वजनिक वाहतूक सुविधांचा प्राधान्याने वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातील किमान एक दिवस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून सकारात्मक पुढाकार घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

महापालिकेच्या अखत्यारीतील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग केंद्रांबाबत प्राप्त प्रस्ताव, परवानग्या व संबंधित प्रशासकीय कार्यवाही प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. चार्जिंग सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला आहे. तसेच महानगरपालिका स्तरावरील बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे, आढावा बैठका व सेमिनार शक्यतो व्हिडीओ कॉन्फरन्सिंग अथवा ऑनलाइन प्रणालीद्वारे आयोजित करण्यात यावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. अंतर्गत बैठका, प्रशिक्षण व समन्वय सभा ऑनलाइन पद्धतीने घेण्यास प्राधान्य देऊन प्रवास व इतर अनुषंगिक खर्चात बचत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहिती, प्रसिद्धी व जनजागृतीसाठी करण्यात येणाऱ्या जाहिराती, बॅनर्स, फ्लेक्स, सजावटीचे विद्युत दिवे व तत्सम खर्चिक बाबींचा वापर आवश्यकतेपुरताच मर्यादित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अनावश्यक खर्च टाळून काटकसरीचे धोरण राबविण्यावर भर देण्यात आला आहे. सर्व कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करावा तसेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलन यंत्रणा, संगणक, उद्वाहन व इतर विद्युत उपकरणे बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअस दरम्यान ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कॅन्टीन, रुग्णालये, वसतिगृहे, बालवाडी, अंगणवाडी केंद्रे तसेच इतर भोजन व्यवस्थांमध्ये खाद्यतेलाचा नियंत्रित व संतुलित वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. आयाताधारित तेलावरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने पाम, सोयाबीन व सूर्यफूल तेलाच्या तुलनेत स्थानिक स्तरावर उपलब्ध मोहरी व शेंगदाणा तेलाच्या वापरास प्रोत्साहन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित विभागांनी पोषणमूल्यांचा विचार करून आवश्यकतेनुसार आहार नियोजनामध्ये सुधारणा कराव्यात, असेही नमूद करण्यात आले आहे.

> महानगरपालिका क्षेत्रामध्ये पीएनजी (पाईप नॅचरल गॅस) वापराला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने पीएनजी जोडणी, वितरण व्यवस्था व संबंधित पायाभूत सुविधांबाबत प्राप्त प्रस्तावांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्रे व प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

> पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत अत्यावश्यक बाबी वगळता नवीन सल्लागार नियुक्ती प्रस्ताव सादर करणे टाळण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांची माहिती सर्व अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना देऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची जबाबदारी सर्व विभाग प्रमुखांवर सोपविण्यात आली आहे.

# स्वागतम ई-प्रवेश प्रणालीला नागरिकांचा मिळतोय प्रतिसाद

**आजपर्यंत सुमारे ७ हजार ८९४ जणांनी घेतला लाभ**

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी सेवा देण्यासाठी दि. १ मे २०२६ पासून महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी 'स्वागतम ई-प्रवेश' ही ऑनलाइन नोंदणी प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून १ मे २०२६ ते २५ मे २०२६ (सायंकाळी ४ वाजेपर्यंत) या कालावधीत सुमारे ७ हजार ८९४ नागरिकांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे.

स्वागतम ई-प्रवेश प्रणालीअंतर्गत नागरिकांना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर जाऊन 'मुख्य इमारत प्रवेश प्रणाली' या लिंकद्वारे आपली नोंदणी करणे सहज शक्य होत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना कमीत कमी वेळेत, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश मिळवून देणे तसेच प्रत्येक प्रवेशाची अचूक नोंद महापालिकेकडे ठेवणे हा आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक असून नागरिकांनी या नव्या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



प्रथमच नोंदणी करणाऱ्या नागरिकांनी आपले लॉगिन अकाऊंट तयार करणे आवश्यक असून त्यामध्ये पूर्ण नाव, राहण्याचा पत्ता, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल क्रमांक आणि आधार क्रमांक यांची माहिती नोंदवावी लागेल.

लॉगिन अकाऊंट तयार करण्याची प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागेल. त्यानंतर नागरिकांना प्रत्येक वेळी थेट लॉगिन करून प्रवेशासाठी नोंदणी करता येणार आहे.

नोंदणीदरम्यान नागरिकांच्या मोबाईल क्रमांकाची ओटीपीद्वारे पडताळणी केली जाणार असून प्रत्येक प्रवेशाच्या वेळीही ओटीपी प्रणाली लागू करण्यात आलेली आहे.

प्रवेश नोंदणी करताना नागरिकांनी किमान १ आणि कमाल ३ विभागांना भेट देण्याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

नागरिकांना नोंदणी करताना ते ज्या दिवशी नोंदणी करीत आहेत, त्या दिवसापासून पुढील ७ दिवसांपर्यंत (शनिवार, रविवार आणि शासकीय सुट्ट्या वगळता) उपलब्ध तारखा दिसतील. त्यानुसार इच्छित दिनांक व संबंधित विभाग निवडून नोंदणी करता येईल.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर क्युआर कोड डाउनलोड करता येईल. हा क्युआर कोड महापालिका मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारावर दाखविल्यानंतर तो स्कॅन करून प्रवेश सुनिश्चित होणार आहे.

जर नोंदणीच्या वेळी क्युआर कोड डाउनलोड केला गेला नसला, तरी नागरिक त्यांच्या लॉगिन अकाऊंटवरून तो कधीही डाउनलोड करू शकतात. तसेच आगाऊ तारखेसाठी नोंदणी केल्यास क्युआर कोड डाउनलोड करण्याची सुविधा संबंधित प्रवेशाच्या दिवशी उपलब्ध होईल.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिककेंद्री आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहे. 'स्वागतम ई-प्रवेश' प्रणालीमुळे नागरिकांना महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी पूर्वनोंदणीची सुलभ सुविधा उपलब्ध झाली असून वेळेची बचत, पारदर्शकता आणि सुरक्षितता सुनिश्चित होत आहे. नागरिकांकडून या उपक्रमाला मिळत असलेला सकारात्मक प्रतिसाद समाधानकारक असून अधिकाधिक नागरिकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## पिंपळे निलखच्या सुपुत्राचा जागतिक स्तरावर दैदिप्यमान पराक्रम

**वाकड (दै. संध्या)**

जिद्द, चिकाटी, शिस्त आणि अथक मेहनतीच्या जोरावर पिंपळे निलख येथील सुपुत्राने आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद यश संपादन केले आहे. उद्योजक समाधान वाकचौरे यांनी व्हिएतनाम येथे आयोजित करण्यात आलेली जगप्रसिद्ध आणि अत्यंत कठीण मानली जाणारी "IRONMAN Vietnam 2026" स्पर्धा तब्बल १३ तास २७ मिनिटे २० सेकंदांत यशस्वीरित्या पूर्ण करून पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे. या स्पर्धेमध्ये २.४ मैल पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२.२ किलोमीटर मॅरेथॉन धाव अशा अत्यंत कठोर शारीरिक व मानसिक क्षमतेच्या टप्प्यांचा समावेश असतो. जगभरातील निवडक स्पर्धकच ही स्पर्धा पूर्ण करू शकतात. अशा प्रतिष्ठेच्या स्पर्धेत यश मिळविणे म्हणजे असामान्य जिद्द आणि आत्मविश्वासाचे प्रतीक मानले जाते. विशेष म्हणजे कोणतीही क्रीडा पार्श्वभूमी नसताना, मधुमेहासारख्या आरोग्याच्या आव्हानांवर मात करत तसेच व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत समाधान वाकचौरे यांनी हा प्रेरणादायी प्रवास पूर्ण केला. त्यामुळे त्यांचे यश अनेक युवकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांच्या हस्ते समाधान वाकचौरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### ठाणे-वाशी सर्कलमधील वीज कंत्राटदारांचा संप: ब्रेकडाऊन मेंटेनन्स काम बंद आंदोलन

भिवंडी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य विद्युत ठेकेदार संघाने ठाणे व वाशी सर्कलमधील सर्व एम्पॅनलमेंट एजन्सींचे ब्रेकडाऊन मेंटेनन्सचे काम बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. "जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत काम बंद" अशी ठाम भूमिका संघाने घेतली आहे. संपाची ९ प्रमुख कारणेः 1. टेंडर रेट्स वादः टेंडर भरताना जे रेट होते, ते निघाल्यानंतर कॉस्ट डेटा रेट्स बदलले 2. बाजारभावाशी तफावतः कॉस्ट डेटा रिव्हाइज करताना सध्याच्या बाजारभावाशी तुलना केली जात नाही 3. बजेट थकबाकी: गेल्या ६ महिन्यांपासून १ वर्षापर्यंत बजेट रिलीज करण्यात आलेले नाही 4. मोबाईल ॲप रद्द कराः नवीन ॲप सिस्टीममुळे एजन्सी व महावितरण कर्मचाऱ्यांना अडचणी 5. मनमानी कारभारः काही अधिकाऱ्यांच मनमानी कारभार बंद करण्याची मागणी 6. वस्तूंचा समावेश नाही: JCB, काँक्रिट कटर, एअर कॉम्प्रेसर, केबल ड्रम यांसारख्या महत्वाच्या वस्तू टेंडरमध्ये नाहीत 7. रात्रीचे डबल रेट्स: रात्री ६ ते सकाळी ६ कामासाठी सर्व रेट्स दुप्पट करावेत 8. खाजगी कंपन्यांशी तुलना: Adani, BEST, TATA प्रमाणे कॉस्ट डेटा शेड्यूल रेट्स समान करावेत 9. महसूल वि. मोबदला: ठाणे-वाशी सर्कल महसूल संकलनात नंबर वन, पण ठेकेदार-कर्मचारी आर्थिक संकटात संघाने असे विचारले"भारताची आर्थिक राजधानी मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरात लाखो ग्राहकांना अखंडित वीज सेवा देणारे ठेकेदार-कर्मचारी आज उपाशी मरण्याची वेळ आली आहे. याला जबाबदार कोण?" "आमची मागणी रास्त आहे, योग्य तो न्याय द्यावा. न्याय मिळाल्याशिवाय काम सुरू केले जाणार नाही" असे महाराष्ट्र राज्य विद्युत ठेकेदार संघाने स्पष्ट केले आहे. या संपामुळे ठाणे, मुलुंड, मुंबई, वाशी परिसरातील ब्रेकडाऊन दुरुस्ती, नवीन कनेक्शनची कामे ठप्प होण्याची शक्यत आहे.



### समाजसेवक जितू गुप्ता यांनी दुर्गम भागातील मतिमंद मुलांच्या शाळेला दिली भेट

मुरबाड (दैनिक संध्या) : जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा..जितू गुप्ता यांनी अवनी मतिमंद निवासी मुलांची शाळा,माळ, मुरबाड येथे भेट देऊन तेथील मुलांसोबत वेळ घालवला संस्थापक प्रतिभा इरकशेट्टी मॅडम यांनी त्या मुलांना खूप छान मार्गदर्शन दिले आहे सर्व मुलं आपल्या आई सारखं प्रतिभा मॅडम मानतात प्रतिभा मॅडम पण त्या मुलांना आईचं प्रेम देतात तिथे मतिमंद मुलांनी मस्त गाणे बोलून दाखवले व त्यांनी हाताने बनवलेल्या सुरेख पणत्या अगरबत्ती व खूप काही वस्तू दाखवल्या ह्यावेळी जितू सर यांच्यासोबत बिराजदार सर,तक्ष सामाजिक संस्थेच्या अध्यक्षया मनीषा गोडसे,समाजसेविका छाया निकम व सुदर्शन भोईर या सर्वांचे प्रतिभा इरकशेट्टी मॅडम यांनी स्वागत केले.




### 'मसाप स्नेहबंध' पुरस्काराने अशोक सुलाखे यांचा गौरव

आळंदी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने म. श्री. दीक्षित यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा सन २०२५ चा प्रतिष्ठेचा 'मसाप स्नेहबंध' पुरस्कार पुस्तकप्रेमी अशोक सुलाखे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनाच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात साहित्य, वाचन संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सुलाखे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास अविनाश धर्माधिकारी, अभिनेते ऋषिकेश जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण तसेच प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांची प्रमुख उपस्थिती होती. अशोक सुलाखे हे पुस्तकप्रेमी म्हणून विशेष ओळखले जातात. वाचन संस्कृती रुजविण्यासाठी त्यांनी आतापर्यंत दहा हजारांहून अधिक पुस्तके विविध मान्यवरांना भेट स्वरूपात दिली आहेत. विशेष म्हणजे त्यांनी स्वतःची पेन्शनही पुस्तक प्रचार आणि वाचन चळवळीसाठी खर्च केली आहे. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक व्यक्त केले. कार्यक्रमात साहित्य, वाचन आणि सामाजिक जाणीवा जपणाऱ्या व्यक्तींमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



### भैरवनाथ सोसायटीच्या चेअरमनपदी कड

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील भैरवनाथ विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी ज्ञानेश्वर उर्फ आप्पा शिवराम कड यांची सर्वांनुमते बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष अमृता राजाराम खराबी यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी, म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या या पदासाठी सोसायटीच्या कार्यालयात निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. ज्ञानेश्वर कड यांचाच एकमेव अर्ज अध्यक्ष पदासाठी आल्याने त्यांची चेअरमन पदी बिनविरोध निवड झाल्याचे सचिव रोहिदास गव्हाणे यांनी घोषित केले. याप्रसंगी ज्ञानेश्वर कड यांच्यासह हनुमंत कड, अमृता खराबी, तानाजी खराबी, मच्छिंद्र कड, संजय कड, अर्जुन कड, राजेंद्र पवार, विठ्ठल बिरदवडे, संगीता खराबी, रामचंद्र खराबी, नवनाथ कड आदी उपस्थित होते. ज्ञानेश्वर कड यांची चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल माजी सरपंच हनुमंत कड व उपस्थित संचालकांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. कड यावेळी म्हणाले, भैरवनाथ सोसायटीचे काम पारदर्शकपणे सुरू असून, सर्वांच्या हिताचे निर्णय घेतले जाणार आहेत.

# शासकीय नोकरीच्या आमिषाने कोट्यवधींची फसवणूक

## बारामती तालुका पोलिसांची मोठी कारवाई; बनावट नियुक्तीपत्रे देत तब्बल १ कोटी ३६ लाखांचा गंडा; टोळीतील आरोपी जेरबंद

बारामती (दै. संध्या)

शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तरुण-तरुणींसह अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांच्या टोळीवर बारामती तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. बनावट नियुक्तीपत्रे देऊन तब्बल १ कोटी ३६ लाख ९० हजार रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२३ ते ४ मे २०२५ या कालावधीत तांदुळवाडी (ता.बारामती) येथील महिला हॉस्पिटल तसेच मळद परिसरात आरोपी अनिकेत धनंजय पाठक याने 'गट-क अधिपरिचारिका' पदावर शासकीय नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवत महिला हॉस्पिटलमधील स्टाफ नर्स व इतरांची ओळख करून घेतली. त्यानंतर अजिंक्य पाठक, सिओना साळवे उर्फ सिओना अनिकेत पाठक, सुधाकर सोळंकी, सागर गायकवाड आणि सुरज असदकर यांच्या मदतीने फिर्यादी व साक्षीदारांकडून वेळोवेळी ऑनलाईन तसेच रोख स्वरूपात तब्बल १ कोटी ३६ लाख ९० हजार रुपये उकळण्यात आले.

विशेष म्हणजे, विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी बनावट नियुक्तीपत्रेही दिली.

मात्र प्रत्यक्षात कोणतीही नोकरी मिळाली नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघड झाला. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस स्टेशनमध्ये मार्च २०२६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू असताना पोलिसांना माहिती मिळाली की आरोपी सुरज तिमयया असदकर हा चिंचवडगाव येथील घरी पत्नीला भेटण्यासाठी येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आर्थिक फायद्यासाठी संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीस ६ दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली.

यापूर्वी अजिंक्य पाठक राहणार दौंड आणि सुधाकर सोळंकी राहणार येरवडा यांना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार यांच्यासह पोलीस अंमलदार सागर देशमाने जितेंद्र शिंदे विठ्ठल तरंगे यांनी ही कारवाई केली. पुढील तपास सुरू आहे.

## हातात कुऱ्हाड घेऊन अख्ख्या कुटुंबाला संपवण्याची धमकी!

उरुळी कांचन (दै. संध्या)

नायगाव (ता. हवेली) येथील श्री काळभैरवनाथ मंदिराच्या प्रांगणात एक महिला पुजारी आणि त्यांच्या पतीला ५ जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत हातात कुऱ्हाड घेऊन संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एकाच कुटुंबातील ५ जणांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे. रविवारी (ता. २४) रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सुनिता नीलेश भैरवकर (वय ४५,व्यवसाय- गृहिणी व मंदिर पुजारी, रा.नायगाव, ता.हवेली) व त्यांचे पती नीलेश भैरवकर अशी मारहाण झालेल्या

■ काळभैरवनाथ मंदिराच्या महिला पुजारीसह पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण, ५ जणांवर गुन्हा



पती-पत्नीची नावे आहेत. तर दादा पिराजी थोरात, मच्छिंद्रनाथ दादा थोरात, शलाका पिराजी थोरात, रोहिणी दादा थोरात, धनश्री दादा थोरात (सर्व रा.नायगाव, ता.हवेली,जि.पुणे) असे मारहाण करणाऱ्यांची नावे आहेत. याबाबत सुनिता भैरवकर यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## हिवरे खुर्दमध्ये आठ लाखाची चोरी; ८ लाख रुपयांचे नुकसान

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील येडगाव धारणालगत असलेल्या कृषी पंपाच्या केबल चोरीची घटना नुकतीच घडली असून या केबल चोरांचा तपास लागण्याच्या आत पुन्हा एकदा जुन्नर तालुक्यातील हिवरे खुर्द येथील शिर्के मळा व वडमाळा परिसरात शनिवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या कृषीपंपाच्या केबलची चोरी केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. हिवरे खुर्द परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.



या घटनेत सुमारे 35 ते 38 शेतकऱ्यांच्या केबल कापून नेण्यात आल्या असून अंदाजे ८ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. प्रत्येक शेतकऱ्याची सुमारे १०० ते १५० मीटर केबल चोरीला गेली आहे. विशेष बाब म्हणजे ज्या शेतकऱ्यांचे पंप त्यावेळी सुरू होते त्यांच्या केबलला हात न लावता बंद अवस्थेत असलेल्या पंपाच्या केबलची चोरी केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ही चोरी पूर्वनियोजित पद्धतीने करण्यात आली असावी असा संशय शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकारामुळे शेतीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या पुरवठ्यावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या घटनेत रामदास अंभुरे, पवन भोर,रामदास भोर , श्रीकांत पडवळ, धनेश सोमोशी , जयराम खिल्लारी ,दत्तात्रय वायकर, पांडुरंग शिर्के,नवनाथ मांडे, नवनाथ येंधे,सुरेंद्र येंधे,संपत वायकर, उल्हास शिंदे ,सुदर्शन अंभुरे,तानाजी खरात, मारुती भोर ,महेश वायकर, प्रल्हाद वायकर, किसन येंधे, विश्वास वायकर, प्रदीप वायकर, मंगेश शिंदे, अरुण येंधे, रोहिदास अंभुरे, महेश हांडे, उल्हास अंभुरे अशा अनेक शेतकऱ्यांची केबल चोरी झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान या प्रकरणी ओतूर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सीसीटीव्ही फुटेज व इतर पुरावे तपासात पुढील तपास सुरू केला आहे. सरपंच मनीष बर्डे व उपसरपंच लक्ष्मण वायकर यांनी पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा शोध लावावा अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या नुकसानीमुळे परिसरात सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## अनधिकृत पार्किंग विरोधात उपोषण करूनही परिस्थिती जैसे थे



चाकण (दै. संध्या)

वाहतूक कोंडी सोडविण्याच्या मोघम गप्पा मारणाऱ्या प्रशासना विरोधात उपोषण करूनही परिस्थिती जैसे थे अशीच राहिली आहे. औद्योगीकीकरणाने विस्तारणाऱ्या चाकण भागात वाढत्या वाहतूक कोंडीने नागरिक अक्षरशः रडकुंडीला आले आहेत. चाकण मधील मोक्याच्या ठिकाणी उड्डाणपूल न बांधता चुकीच्या ठिकाणी पूल बांधल्याने रात्री अपरात्री केव्हाही प्रचंड वाहतूक कोंडी होते. त्यामुळे सर्वांनाच मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. पूर्वीचे चाकण आणि आजचे चाकण यात मोठा बदल झाला आहे. औद्योगिकीकरण आणि त्याच तुलनेत नागरिकीकरण वाढल्याने वाहनांची संख्या सुद्धा अफाट वाढली आहे.

वाहन चालकांच्या बेफिकिरीमुळे अनेकांचे नाहक बळी गेले आहेत. चाकणसह महाळुंगे इंगळे परिसरात बेकायदेशीर आणि अनधिकृत पार्किंग मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका वाढल्याने नागरिकांसह कामगार हैराण झाले आहेत. चाकण भागातील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्यावरील दुतर्फा होत असलेली अनधिकृत पार्किंग मार्गी लावण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांनी पाठपुरावा केला. मात्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले आहे. रोजच्या होत असलेल्या वाहतूक कोंडीने व अनधिकृत पार्किंग मुळे खेड तालुक्यातील जनता मरणयातना सहन करत आहेत.

### ठोस उपाययोजनांची गरज

> "चाकण भागातील वाहतूक कोंडी मार्गी लावण्यासाठी सुसज्ज अशी पार्किंग व्यवस्था केली पाहिजे. प्रशासनाचे नियंत्रण असणे अपेक्षित असून, नागरिकांचा मनस्ताप थांबवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे."
> **- नवनाथ शेडगे, उद्योजक, वाघजाईनगर, चाकण**

## कांदा दर घसरणी विरोधात मंचरमध्ये लिलाव बंद

### देवदत्त निकम यांचा आंदोलनाचा इशारा

मंचर (दै. संध्या)

कांद्याच्या बाजारभावात मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. राज्य व केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मंचर (ता. आंबेगाव) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतीत मंगळवारी (ता. २६) कांदा लिलाव शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष देवदत्त निकम यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आदोलन केले. कांदा लिलाव बंद पाडले. यावेळी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करून कांद्याला किमान २० रुपये प्रतिकिलो दर मिळावा, अशी मागणी संतप्त आंदोलकांनी केली. यावेळी झालेल्या बैठकीत पुणे जिल्हा परिषद सदस्या प्रीती प्रवीण थोरात, तालुका अध्यक्ष धोंडीभाऊ भोर, युवक अध्यक्ष विशाल वाबळे व शेतकरी उपस्थित होते. निकम म्हणाले, यापूर्वी



सरकारने जाहीर केलेला १२रुपये ३५पैसे प्रतिकिलो बाजारभाव व्यवहार्य नाही. नाशिक जिल्ह्यासाठी १५ रुपये ८० पैसे प्रती किलो दराने कांदा खरेदीचा निर्णय सोमवारी (ता. २५) रोजी रात्री जाहीर करण्यात आला असून तो संपूर्ण राज्यासाठी लागू करावा, संपूर्ण राज्यात एकसमान दर लागू करावा. हा प्रश्न धसास लावण्यासाठी शरद चंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधींच्या निवास स्थानासमोर आंदोलन करतील याची नोंद प्रशासनाने घ्यावी.

# चोरी प्रकरणी अहवाल व खुलासे तातडीने मागवले

### रोखपाल महेश गोखले याची अनछत्रेत बदली

आळंदी (दै. संध्या)

श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरातील स्वयंसेवक विशाल वारूळे याच्या संशयास्पद प्रकारानंतर संस्थान कमिटीने कठोर भूमिका घेत मंदिर प्रशासनात व्यापक बदलांची घोषणा केली आहे. सीसीटीव्ही तपासणीत कॅश विभागातून हार, फुले व प्लास्टिकचे पोते नेत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर विशाल वारूळे याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप यांनी सांगितले.

संस्थानच्या सीसीटीव्ही विभागातील कर्मचारी श्रीकांत लवांदे यांनी मागील आठवड्याचे फुटेज तपासत असताना १२, १३ व १६ मे रोजी वारूळे याच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. त्यानंतर संस्थान प्रशासनाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमा नरके यांच्याशी संपर्क साधून पुढील कारवाई केली. या घटनेनंतर अन्नदान व कॅश विभागात स्वयंसेवकांना बंदी घालण्यात आली असून कर्मचारी, सुरक्षा रक्षक व सेवेकऱ्यांसाठी गणवेश व ओळखपत्र सक्तीचे करण्यात आले आहे. मंदिरात



प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र तपासणी व्यवस्था लागू करण्यात आली असून पिशव्या आणण्यासही मनाई करण्यात आली आहे.

दानपेटी उघडण्यापासून रोकड मोजणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया आता सीसीटीव्ही व व्हिडिओ शूटिंगच्या देखरेखीखाली होणार आहे. फेस आयडी, थम्ब आयडी आणि आरएफआयडी प्रणालीसह कॅश विभाग पूर्णतः बंदिस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मंदिर प्रशासन अधिक पारदर्शक करण्यासाठी अत्याधुनिक ईआरपी सॉफ्टवेअर व एआय तंत्रज्ञान लागू करण्याची प्रक्रियाही सुरू आहे.

दरम्यान, २५ मे रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत प्रशासन सहव्यवस्थापक सागर वाळके, रोखपाल महेश गोखले, अन्नदान कक्षाचे पांडुरंग कुटे तसेच प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांच्याकडून खुलासा व अहवाल मागविण्यात आला आहे. तसेच रोखपाल महेश गोखले यांची बदली अन्नदान कक्षात करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

यावेळी प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, पुरुषोत्तम महाराज पाटील, चैतन्य महाराज लोंढे तसेच ग्रामस्थ प्रतिनिधी म्हणून डि.डि. भोसले, नंदकुमार कुऱ्हाडे, विलास घुंडरे, रामभाऊ भोसले, संजय घुंडरे आणि सचिन गिलबिले उपस्थित होते. विशाल वारूळे प्रकरणातील पोलिस तपासाचा पाठपुरावा सुरू असून दोषींना पाठीशी घातले जाणार नाही, अशी भूमिका संस्थान प्रशासनाने स्पष्ट केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

मुंबई (दैनिक संध्या) : मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने 'मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना माहिती पुस्तिका २०२६' नुकतीच प्रकाशित करण्यात आली. सदर पुस्तिकेमध्ये मत्स्यव्यवसाय विभागाच्या 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनांतर्गत उपलब्ध आर्थिक सवलतींची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. या पुस्तिकेमुळे सामान्य मच्छीमार, मत्स्यसंवर्धक तसेच मच्छिमार सहकारी संस्थांना योजनेची माहिती सुलभपणे मिळून त्याचा लाभ घेण्यास प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे. राज्य शासनाने 'विकसित महाराष्ट्र – विकसित भारत २०४७' हे दीर्घकालीन ध्येय निश्चित केले असून, त्या अनुषंगाने मत्स्यव्यवसाय विभागाने प्रस्तावित केलेल्या विविध योजना सामाजिक व आर्थिक परिणाम लक्षात घेऊन तयार करण्यात आल्या आहेत. या योजनांमध्ये कार्यक्षम अंमलबजावणी, विपणनपूर्व धोरण, महसूलवाढ तसेच पर्यायी गोड्या पाण्यातील स्रोतांची ओळख अशा महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे. यामुळे 'विकसित महाराष्ट्र २०४७' हे उद्दिष्ट साध्य करण्यास तसेच मच्छीमारांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्यास मदत होईल.

### 'घटस्फोटासाठी किती खालच्या थराला जाल?' हायकोर्टाचा IPS अधिकाऱ्यावर सवाल

नागपूर (दैनिक संध्या) : एखादा पती घटस्फोट मिळविण्यासाठी किती खालच्या थराला जाऊ शकतो, याचे उदाहरण मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठातील एका प्रकरणामुळे समोर आले. आयपीएस अधिकारी असलेल्या संबंधित पतीने त्याच्या सुदृढ डॉक्टर पत्नीला मनोरुग्ण ठरवण्याचा प्रयत्न केला होता. न्यायालयाने हा मनसुबा उधळून लावत पतीचे सर्व आरोप बिनबुडाचे, निराधार व गुणवत्ताहीन ठरवले. न्यायमूर्तिद्वय मुकुलिका जवळकर व नंदेश देशपांडे यांनी हा निर्णय दिला. प्रकरणातील पती चंद्रपूर तर, पत्नी अमरावती येथील रहिवासी आहे. पतीने पत्नीच्या विचित्र वागणुकीचे विविध प्रसंग सांगून ती मनोरुग्ण असल्याचा दावा केला होता. परंतु, सुरुवातीला कुटुंब न्यायालयाने त्याची घटस्फोटाची मागणी नामंजूर केली. त्यामुळे त्याने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. उच्च न्यायालयानेही रेकॉर्डवरील मुद्दे विचारात घेता पतीचे अपील फेटाळून लावले. पती विभक्त झाल्यानंतर पत्नीने पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. त्यावरून ती मानसिकदृष्ट्या स्वस्थ असल्याचे स्पष्ट होते, असे न्यायालय म्हणाले. या दाम्पत्याचे २१ मे २००७ रोजी लग्न झाले असून पती २०१३ मध्ये पत्नीपासून वेगळा झाला आहे. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. न्यायालयाने पत्नीला पतीसोबत नांदण्याचा अधिकार बहाल केला आहे.

### देशात न्यायासाठी प्रतीक्षा वाढली! हायकोर्टातील न्यायमूर्तींची 29% पदे रिक्त

नागपूर (दैनिक संध्या) : वाचून धक्का बसला असेल, पण हे खरे आहे. देशामध्ये हायकोर्ट न्यायमूर्तींची तब्बल २९ टक्के पदे रिक्त आहेत. त्यामुळे पक्षकारांना वेळेत न्याय कसा मिळेल, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. न्यायाला विलंब होणे म्हणजे न्याय नाकारणे होय, असे विधी क्षेत्रात म्हटले जाते. ही परिस्थिती टाळायची असल्यास प्रलंबित प्रकरणे झपाट्याने निकाली निघणे आवश्यक आहे आणि त्यासाठी न्यायालये पूर्ण क्षमतेने कार्यरत असली पाहिजे. परंतु, देशातील २५ पैकी मेघालय व सिक्कीम ही दोन उच्च न्यायालये वगळता इतर २३ उच्च न्यायालयांमध्ये न्यायमूर्तींची पदे रिक्त आहेत. सर्व उच्च न्यायालयांना एकूण १ हजार १२२ पदे मंजूर असून सध्या केवळ ७९७ न्यायमूर्तीच कार्यरत आहेत. ३२५ रिक्त पदांवर नवीन नियुक्त्या करण्याची गरज आहे. देशातील उच्च न्यायालयांमध्ये एकूण ६४ लाख १८ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यात ४४ लाख २१ हजार दिवाणी आणि १९ लाख २७ हजार फौजदारी प्रकरणांचा समावेश आहे. धक्कादायक म्हणजे, यातील २४ टक्के प्रकरणे १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित आहेत.

### सहलीच्या नावाखाली 'राजकीय पर्यटन'?

चंद्रपूर (दैनिक संध्या) : वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीपूर्वी राजकीय हालचालींना वेग आल्याची चर्चा रंगू लागली आहे. उमेदवारांची घोषणा अद्याप बाकी असली, तरी मतदार असलेल्या नगरसेवकांवर सर्व पक्षांनी लक्ष केंद्रीत केल्याचे बोलले जात आहे. भाजपमधील सूत्रांच्या दाव्यानुसार, तीनही जिल्ह्यांतील महाविकास आघाडीशी संबंधित ११५ हून अधिक नगरसेवक भाजपच्या संपर्कात असून, काहींना सहलीच्या नावाखाली अज्ञातस्थळी हलविण्यात आल्याचीही चर्चा आहे. यामध्ये काँग्रेसशी संबंधित नगरसेवकांची संख्या अधिक असल्याचाही दावा केला जात आहे. मात्र, या दाव्याला कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. स्थानिक मतदारसंघाच्या स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये मतदारांची 'जुळवाजुळव', गुप्त बैठका आणि शेवटच्या क्षणी होणारी राजकीय समीकरणे नवी नसल्याने या चर्चांनी राजकीय वातावरण तापले आहे. 'मतदार व्यवस्थापन' की 'राजकीय ऑपरेशन', यावर आता चर्चा सुरू झाली आहे. याबाबत भाजपचे आमदार किर्तिकुमार ऊर्फ बंटी भांगडिया यांनी सावध भूमिका घेतली आहे. दुसरीकडे, या संपूर्ण प्रकरणावर काँग्रेसमधील नेत्यांकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# तंबाखूला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार

**आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्र झपाट्याने प्रगती करत असताना दुसऱ्या बाजूला तंबाखूचे वाढते व्यसन समाजासमोर गंभीर आरोग्य संकट निर्माण करत आहे. गुटखा, पानमसाला, खर्रा, सिगारेट, बीडी तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन युवकांपासून प्रौढांपर्यंत चिंताजनक गतीने वाढताना दिसत आहे. या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी ३१ मे हा दिवस 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' म्हणून साजरा केला जातो. यावर्षी 'खोट्या आकर्षणाचा पर्दाफाश – निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाला चोख प्रत्युत्तर' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित केवळ जनजागृती न करता, समाजामध्ये तंबाखूविरोधी एक व्यापक जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. तंबाखू हे केवळ क्षणिक आनंदाचे व्यसन नसून ते तोंडाचा, घशाचा व फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग आणि स्ट्रोक यांसारख्या अनेक जीवघेण्या आजारांचे मूळ कारण ठरत आहे.**




या गंभीर आव्हानाचा सामना करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात जनजागृती, समुपदेशन, व्यसनमुक्ती सेवा आणि कायद्याची अंमलबजावणी या चहुबाजूने प्रभावी कामगिरी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १७ तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्रातून एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ५,७६३ रुग्णांची नोंदणी करण्यात आली, ज्यापैकी ९८४ नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन पूर्णपणे सोडण्यात यश मिळवले आहे. ही आकडेवारी व्यसनमुक्तीच्या दिशेने पडणारे एक आशादायक पाऊल मानली जात असली, तरी दुसरीकडे राबविण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत ७१३ संशयित रुग्णांपैकी ४२ जणांमध्ये कर्करोगाचे झालेले निदान समाजासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारे ठरले आहे. तरुणाईला या जीवघेण्या विळख्यातून सुरक्षित ठेवण्यासाठी शैक्षणिक आणि आरोग्य संस्थांमध्ये विशेष उपक्रम राबवून जिल्ह्यात ११७ तंबाखूमुक्त शाळा आणि ५३६ तंबाखूमुक्त आरोग्य संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे.

शाळा परिसरात तंबाखू विक्रीला प्रतिबंध करण्यासोबतच विविध व्याख्याने, सामूहिक शपथ आणि पोस्टर मोहिमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडत आहेत. केवळ प्रबोधनावर न थांबता, कोटपा (COTPA 2003) कायद्यांतर्गत पोलीस, आरोग्य आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे मोठी मोहीम उघडली आहे. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ५६१ लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामध्ये आरोग्य विभागाने ४,६७,००० रुपये, पोलीस विभागाने १,९२,००० रुपये आणि अन्न व औषध प्रशासनाने ३४,००० रुपयांची दंडवसुली करत कायद्याचा कडक बडगा उगारला आहे. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीमुळे त्याच्या आसपास वावरणाऱ्या लहान मुलांच्या, महिलांच्या आणि वृद्धांच्या आरोग्याला निर्माण होणारा 'पॅसिव्ह स्मोकिंग'चा धोका लक्षात घेता हा लढा आता केवळ प्रशासकीय न राहता समाजाची सामूहिक जबाबदारी बनला आहे. पालक, शिक्षक, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन तरुणांना योग्य दिशा देणे ही काळाची गरज आहे. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी १८००-११-२३५६ हा मोफत समुपदेशन टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून नागरिकांनी याचा लाभ घेणे आवश्यक आहे.

'तंबाखूला नकार आणि निरोगी जीवनाचा स्वीकार' करत सशक्त राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक कोल्हापूरकराने या व्यसनमुक्तीच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे हेच या जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे खरे उद्दिष्ट ठरेल. जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखू विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आरोग्य, पोलीस व अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत संयुक्त मोहिमा राबविण्यात येत आहेत.

**– राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष कोल्हापूर**

# समाजसुधारणेचा दीपस्तंभ : राजा राममोहन रॉय

**राजा राममोहन रॉय हे भारतीय पुनर्जागरणाचे अग्रदूत मानले जातात. आधुनिक भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक सुधारणांचा पाया घालणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाची जयंती म्हणजे समाजप्रबोधनाच्या कार्याची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस होय. एकोणिसाव्या शतकात त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाज सुधारणांसाठी केलेले प्रयत्न,त्यासाठी उभारलेला सनदशीर लढा आणि कायद्याची मदत घेऊन केलेल्या समाजसुधारणा आजही प्रेरणादायी आहेत.**

त्यांनी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या संक्रमणकाळात भारतीय समाजाला नव्या विचारांची दिशा दिली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात आधुनिकतेची पहाट उगवली. राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय आणि आई तारिणी देवी हे धार्मिक वृत्तीचे होते. बालपणापासूनच त्यांना संस्कृत, फारसी, अरबी, बंगाली आणि इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त झाले. विविध धर्मग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. वेद, उपनिषदे, कुराण आणि बायबल यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी मानवतेचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला. त्यांचा उत्कर्ष हा भारतातील सामाजिक आणि वैचारिक संक्रमणाच्या काळात झाला.

त्या काळात भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. इंग्रजांचे राजकीय वर्चस्व वाढत असताना भारतीय समाज मात्र अनेक अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा आणि कालबाह्य चालीरीतींमध्ये अडकलेला होता. स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्रीशिक्षणावरील बंदी, विधवांचा होणारा छळ, जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींनी समाज पोखरला होता. धर्माच्या नावाखाली कर्मकांडांना अधिक महत्त्व आले होते. समाजात विवेकापेक्षा अंधश्रद्धेचे वर्चस्व वाढले होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत राजा राममोहन रॉय यांनी समाजसुधारणेचा ध्यास घेतला. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवला. विशेषतः सतीप्रथेच्या विरोधातील त्यांचा लढा ऐतिहासिक मानला जातो. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला जिवंत जाळण्याची अमानवी प्रथा त्यांनी मानवतेविरुद्धचा अपराध असल्याचे ठामपणे मांडले. त्यांनी अनेक लेख, पुस्तके आणि निवेदने लिहून समाजमत जागृत केले. इंग्रजी सत्ताधाऱ्यांशी पत्रव्यवहार करून त्यांनी सतीप्रथा बंद करण्याची मागणी सातत्याने केली. त्या काळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेन्टींक यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १८२९ मध्ये सतीप्रथेवर बंदी घालणारा कायदा लागू करण्यात आला. हा भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला. राजा राममोहन रॉय यांनी १८२८ मध्ये "ब्राह्मो समाज" या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून एकेश्वरवाद, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विवेकनिष्ठ विचार यांचा प्रचार करण्यात आला. त्यांनी मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि अवास्तव कर्मकांडांना विरोध केला. धर्म म्हणजे मानवसेवा आणि नैतिकता हा संदेश त्यांनी दिला.

शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षण, विज्ञान आणि गणित या विषयांच्या अभ्यासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. भारतीय युवकांनी आधुनिक ज्ञान मिळवावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी हिंदू कॉलेज स्थापनेतही पुढाकार घेतला. बंगाली भाषेत अनेक ग्रंथ प्रकाशित करून त्यांनी समाजप्रबोधन केले.

"संवाद कौमुदी आणि "मिरात-उल-अखबार"यांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली. भारतीय पत्रकारितेचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो. समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सनातनी मंडळींनी त्यांच्यावर टीका केली. धर्मविरोधी, परंपराविरोधी अशी त्यांची बदनामी करण्यात आली. काहींनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचाही प्रयत्न केला. मात्र त्यांनी विवेक, तर्क आणि मानवतेच्या आधारावर आपले कार्य अखंड सुरू ठेवले. समाजहितासाठी संघर्ष करण्याची त्यांची वृत्ती अत्यंत प्रेरणादायी होती.

राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंडमधील सत्ताधाऱ्यांशी आणि विचारवंतांशीही पत्रव्यवहार केला. भारतीय समाजातील परिस्थिती, शिक्षणाची गरज आणि सुधारणांचे महत्त्व त्यांनी ब्रिटिश प्रशासनाला पटवून दिले. भारतात आधुनिक शिक्षणपद्धती सुरू व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचाही पुरस्कार केला. प्रेसवरील निर्बंधांविरोधात त्यांनी आवाज उठवला.

सन १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी भारतीयांच्या प्रश्नांबाबत भूमिका मांडली. इंग्लंडमधील अनेक विद्वानांनी त्यांच्या विचारांचे स्वागत केले. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टलजवळील स्टेपलटन येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारताने एक महान समाजसुधारक गमावला; मात्र त्यांनी पेटवलेला समाजप्रबोधनाचा दीप आजही तेवता आहे. राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचा प्रभाव भारतातील अनेक समाजसुधारकांवर पडला. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक केली. महाराष्ट्र अशा सामाजिक सुधारणांच्या कायम पाठीशी राहिले आहे.राजा राममोहन रॉय यांच्या विविध चळवळीचे, उपक्रमाचे, समाजसुधारणांचे महाराष्ट्राला कायम आकर्षण राहिले असून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रेरणा मिळाली आहे. आज महाराष्ट्र शासनही महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासाठी विविध योजना राबवत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिलांच्या सुरक्षिततेसाठी, स्वावलंबनासाठी आणि आरोग्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, महिला बचतगटांचे सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, महिला अत्याचार प्रतिबंध, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना शासनाने स्वीकारल्या आहेत. "बेटी बचाओ, बेटी पढाओ", महिला स्वयंसहाय्यता गट, कौशल्य विकास कार्यक्रम, तसेच डिजिटल शिक्षण यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लाडकी बहीण योजनेच्या मार्फत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे व त्या माध्यमातून आर्थिक सुधारणांचे नवे दालन राज्य शासनाने उघडले आहे. सामाजिक सुधारणा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. राजा राममोहन रॉय यांनी दिलेला विवेक, समानता आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सामाजिक समतेचा, स्त्री-सन्मानाचा आणि प्रबोधनाचा विचार पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. हेच त्यांना त्यांच्या जयंती दिनाला खरे अभिवादन ठरेल.





**– प्रवीण टाके, उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
9702858777**

# मॅरिकोची हेअर क्लीन्सिंग क्षेत्रात एंट्री ; 'पॅराशूट अॅडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पू'सह नवोन्मेषाला गती

**मुंबई (दै. संध्या)**

**मॅरिको दरवर्षी लाखो घरांपर्यंत पोहोचणाऱ्या श्रेणींमध्ये आपला पोर्टफोलिओ विस्तारण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. यामुळे कंपनीला या क्षेत्रात विकासाच्या महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होतील; हेच क्षेत्र सध्या प्रीमियम उत्पादनांच्या मागणीत वर्ष-दर-वर्ष वाढ घडवून आणत आहे. भारतातील केसांच्या निगेवरील ग्राहकांच्या खर्चातील आपला वाटा वाढवण्यासाठी, मॅरिकोने शॅम्पू क्षेत्रात प्रवेश केला आहे. या विभागात आपले स्थान अधिक बळकट करण्याचे मॅरिकोचे उद्दिष्ट आहे. पॅराशूट अॅडव्हान्स्डच्या वाढीमध्ये आपल्या शॅम्पू उत्पादनांचा पोर्टफोलिओ एक महत्वपूर्ण योगदान देईल, अशी अपेक्षा कंपनीला आहे.**




भारतातील आघाडीच्या FMCG कंपन्यांपैकी एक असलेल्या, मॅरिको लिमिटेड ने आज पॅराशूट अॅडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पूच्या लाँचसह हेअर क्लिन्झिंग श्रेणीमध्ये प्रवेश करून, हेअरकेअर क्षेत्रामधील आपले स्थान अधिक बळकट केले आहे. नारळ आणि नैसर्गिक घटकांच्या गुणधर्मांनी समृद्ध असलेली ही नवीन प्रोटीन शॅम्पू श्रेणी, हेअरकेअर क्षेत्रात या ब्रँडचे स्थान अधिकच बळकट करेल.

आशिष गोपाल, सीईओ - इंडिया कोअर बिझनेस, मॅरिको लिमिटेड म्हणाले, "पॅराशूट अॅडव्हान्स्ड कोकोनटच्या गुणधर्मांसह हेअर-क्लिंझिंग स्वरूपातील हे उत्पादन सादर करणे, हे गेल्या काही वर्षांत मॅरिकोने आपल्या श्रेणीत केलेला एक महत्त्वपूर्ण विस्तार दर्शवते. नैसर्गिक उत्पादनांसाठी ग्राहकांची वाढती मागणी पूर्ण करण्याच्या उद्देशाने पॅराशूट अॅडव्हान्स्ड शॅम्पू हे एक धोरणात्मक पाऊल आहे. यावरून उद्देशपूर्ण आणि नारळावर आधारित नावीन्यपूर्ण उत्पादने सादर करण्याबाबतची मॅरिकोची कटिबद्धता दिसून येते. या उत्पादनाच्या लाँचमुळे भारतातील पर्सनल केअर क्षेत्रात कंपनीचे स्थान अधिक बळकट होईल; या क्षेत्राचे मूल्य ₹10,000 कोटींहून अधिक असून, ते 9 ते 10 टक्के दराने वाढत आहे.[1] पॅराशूट अॅडव्हान्स्डच्या हेअर क्लिन्सिंग क्षेत्रातील प्रवेशामुळे वाढीच्या प्रचंड संधी निर्माण होतील आणि संपूर्ण हेअर-केअर रुटीनमध्ये ब्रँडची पोहोच वाढेल. ग्राहकांनी या शॅम्पूचे अत्यंत उत्साहाने स्वागत केले आहे. आम्हाला खात्री आहे की, बाजारपेठेत या उत्पादनाची मागणी वेगाने वाढेल." विक्रम करवाल, मुख्य विपणन अधिकारी – इंडिया, मॅरिको लिमिटेड म्हणाले, "ग्राहक पर्सनल केअर उत्पादनांसाठी केवळ प्रतिष्ठित ब्रँड्सवरच अवलंबून असतात. ते अधिकाधिक नैसर्गिक उत्पादनांचा शोध घेत आहेत. त्यामुळे, पॅराशूट अॅडव्हान्स्ड साठी शॅम्पू श्रेणीमध्ये एक महत्वपूर्ण संधी उपलब्ध आहे. याच जाणिवेचा आधार घेत, आम्ही असे एक उत्पादन निर्माण केले आहे जे आमच्या ग्राहकांना मनापासून आवडेल. हा एक असा ब्रँड आहे जो भारतात आणि भारतासाठीच घडवला गेला आहे. जो येथील स्थानिक लोकांच्या गरजा समजून घेतो आणि ज्या निष्ठेने आमचा मूळ ब्रँड उभा राहिला, त्याच निष्ठेने लोकांच्या केसांची निगा राखण्यासाठी ज्याची रचना करण्यात आली आहे. आम्ही टेलिव्हिजन, डिजिटल चॅनेल्स, क्रिएटर्ससोबतचे सहकार्य आणि प्रादेशिक प्लॅटफॉर्म्सचा उपयोग करून, एका सशक्त, बहु-स्वरूपी विपणन योजनेद्वारे या ब्रँडचा प्रचार करू. आमचा ब्रँड लाखो घरांपर्यंत पोहोचतो. अनेक दशकांपासून, त्याने विविध भौगोलिक प्रदेशांतील आणि उत्पन्न गटांतील लोकांसोबत घनिष्ठ आणि विश्वासार्ह नातेसंबंध जपले आहेत. आमच्या ग्राहकांमध्ये ब्रँडची दृश्यमानता वाढवण्याच्या उद्देशाने, या नात्याचा सन्मान करण्यासाठी आम्ही उत्पादन-प्रकाशन योजना तयार केली आहे."

पॅराशूट अॅडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पूची नवीन श्रेणी केसांमधील प्रोटीनचे नुकसान टाळते. या उत्पादनाद्वारे ब्रँडने डॅमेज रिपेअर क्षेत्रात प्रवेश केला आहे. नवीन पॅराशूट अॅडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पूच्या श्रेणीमध्ये कोरफडीसोबत नारळ, रोझमेरी, आवळा, शिकेकाई, बदाम इत्यादी नैसर्गिक घटक असलेले विविध प्रकार उपलब्ध आहेत. यातील प्रत्येक प्रकार ग्राहकांना केसांचे गळणे रोखणे आणि केसांची चमक वाढवणे यांसारखे अनेक फायदे मिळवून देतो.

आपल्या मजबूत बाजारपेठेतील स्थानामुळे आणि व्यापक पोहोचमुळे, पॅराशूट अॅडव्हान्स्डने नवीन स्वरूपांमध्ये एक विश्वासार्ह आणि किफायतशीर उपाय सादर केला आहे. त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये विविध पॅक आकारांमध्ये उपलब्ध असलेले आठ प्रकार आहेत. केवळ ₹1 किमतीचा एक प्राथमिक स्तरावरील सॅशे उपलब्ध आहे, ज्यामुळे मोठ्या संख्येने लोकांना हे उत्पादन वापरून पाहणे शक्य होते. याव्यतिरिक्त, जनरल ट्रेड, मॉडर्न ट्रेड आणि ई-कॉमर्स स्टोअर्समध्ये हे उत्पादन 80 मि.ली., 170 मि.ली., 340 मि.ली., 650 मि.ली., 1 लि. आणि 1.2 लि. अशा विविध आकारांच्या पॅकमध्ये उपलब्ध आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने स्व. विलासराव देशमुख यांची जयंती साजरी

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने माजी केंद्रिय मंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. विलासरावजी देशमुख यांच्या जयंती निमित्त काँग्रेस भवन येथे पुणे शहर काँग्रेसचे पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप व पश्चिम विभाग अध्यक्षा दिप्तीताई चवधरी यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार मोहन जोशी, महानगरपालिकेतील गटनेते चंदूशेठ कदम, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, शानी नौशाद, नगरसेवक दिपाली डोख, अश्विन लांडगे, सुनिल शिंदे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, सेवादलाचे लतेंद्र भिंगारे, इंटक अध्यक्ष चेतन आगरवाल, ज्येष्ठ नागरिक संघाचे द. स. पोळेकर, जयंत किराड, राजेंद्र भुतडा, रमेश अय्यर, सचिन आडेकर, रमेश सोनकांबळे, रविंद्र माझीरे, बाळासाहेब अमराळे, आशिष व्यवहारे, सुरेश कांबळे, पप्पु घोलप, राहुल जगताप, केविन मॅन्युल, गौरव बाळिंदे, हर्षद हांडे, सेल्वराज ॲथोनी, नितीन परतानी, आयुव पठाण, नरसिंह अंदोली, वैभव डांगमाळी, रवि आरडे, संदिप मोकाटे, राहुल वंजारी, ॲड. संतोष जाधव, मजहर मणियार, सागर धावडे, कान्हुभाऊ साळूंके, पांडुरंग गायकवाड, शिवाजी सोनार, सोमनाथ पवार, सुरेश तनपुरे, सचिन गोरड, अक्षय मराठे, सागर घारे, नवनाथ जोरी, निलेश खैरे, बाळा धायगुडे, सतिश मंगडे, प्राजक्ता जाधव, ज्योती अडागळे, अंजली सोलापूरे, कल्पना शिंदे, प्रवीणा तांबोळी, सुरेश नांगरे आदीसह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### जगदंब प्रतिष्ठानचा उपक्रम; उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी शहरभर पाण्याच्या कुंड्या

जुन्नर (दैनिक संध्या) : उन्हाळ्याची तीव्रता गेल्या काही दिवसांपासून वाढल्याने जुन्नर शहरात पशुपक्ष्यांसाठी जगदंब प्रतिष्ठान जुन्नर यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याच्या कुंड्या बसविण्यात आल्या असून या पाण्याच्या कुंड्यांमुळे पशु पक्षांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबण्यास मदत होणार आहे. जगदंब प्रतिष्ठान यांनी राबविलेल्या या अनोख्या उपक्रमाचे शहरातील नागरिक तसेच पर्यावरण प्रेमींकडून स्वागत केले जात आहे. या उपक्रमांतर्गत प्रतिष्ठानच्या वतीने शहरातील कल्याण पेठ गणपती मंदिर, रविवार पेठ गणपती मंदिर,लोणार आळी खोकलाई देवी मंदिर, हनुमान मंदिर वरचा माळीवाडा,भीमनगर पाडळी,बेळे अळी,तेली बुधवार पेठ गणपती मंदिर,जगदंबा भोई अळी गणेश मंडळ,खालचा माळी वाडा,भाई कोत वाल चौक,दिल्ली पेठ साई मंडळ,शुक्रवार पेठ गणेश मंडळ,जुन्नर नगर पलिका परिसर,ब्राह्मण बुधवार पेठ,परदेशपुरा पार,सराई पेठ गणपती मंदिर,गवत बाजार दत्त मंदिर,शंकर पुरा गणपती मंदिर,वरळी अळी गणपती मंदिर,रोकडे मारुती मंदिर,शिवस्मारक चौक या ठिकाणी कुंड्या बसविण्यात आल्या असल्याची माहिती अध्यक्ष विनायक गोसावी, उपाध्यक्ष सौरभ वर्पे व खजिनदार अभिषेक शिंदे यांनी दिली. या उपक्रमासाठी नगरसेविका अलका फुलपगार, अनिल रोकडे, दर्शन फुलपागर, अजित साळवे,सुभाष शिंदे,सुभाष तितर, नारायण डोके, ओंकार गाजरे, गणेश चौधरी, नरेश शहा, आशिष गोसावी, अथर्व जुनंद्रे, विशाल रोकडे,अथर्व चौधरी, अक्षय सावंत,करण धोत्रे, सनी खराडे, सोनू मुसळे, हिमांशू चौधरी, कृष्णा फटांगडे यांनी सहकार्य केले.

### आंबेगाव तालुक्याच्या पूर्वभागात अवकाळी पावसाने महावितरणचे मोठे नुकसान

पारगाव (दैनिक संध्या) : आंबेगाव तालुक्याच्या पूर्वभागात मागच्या आठवड्यात झालेल्या अवकाळी मुसळधार पावसाने महावितरण चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पूर्वभागातील गावांमधील विजेचे एकूण सुमारे ८० खांब उन्मळून पडल्याने अनेक वाड्यावस्त्यावरील वीज पुरवठा खंडीत झाला आहे. महावितरण कडुन वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु असल्याची माहिती निरगुडसर शाखा कार्यालयाचे सहाय्यक अभियंता नितेश भसारकर यांनी दिली. तालुक्याच्या पुर्व भागातील अवसरी बुद्रुक, टाव्हरेवाडी, धामणी, मेंगडेवाडी, पारगाव, जारकरवाडी, लाखणगाव, खडकवाडी, पोंदेवाडी, काठापुर बुद्रुक, देवगाव, लोणी, रानमळा, वाळुंजनगर परिसरात शुक्रवार (दि.२२) रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास सोसाट्याचा वारा, ढगाचा गडगडाट सह पाऊस सुरु झाला. अचानक आलेल्या पावसामुळे तसेच सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आंब्याच्या झाडाला लगडलेल्या कैऱ्या पडून व उन्हाळ्यात बाजरीची उभे पिके आडवी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. लाखणगाव परिसरातील अनेक पोल्ट्री व्यावसायिकांचे शेडचे छप्पर उडाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी घरांचे व जनावरांच्या गोठ्यांचेही नुकसान झाल्याने संसार उघडे पडले आहेत.

## वीर धरणातील पाणीसाठा दिलासादायक

# दोन्ही कालव्यांतून मोठ्या प्रमाणात सिंचनासाठी पाणी वापर

### निरा प्रणालीत सध्या २०.६२ टीएमसी पाणी उपलब्ध; मागील वर्षाच्या तुलनेत स्थिती स्थिर

नीरा (दै. संध्या)

राज्यात अनेक भागांत पाण्याची टंचाई जाणवत असताना निरा नदी प्रणालीतील धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्यामुळे पुणे, बारामती, इंदापूर, पुरंदर आणि फलटण परिसराला मोठा दिलासा मिळाला आहे. पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार संपूर्ण निरा नदी प्रणालीत सध्या सुमारे २०.६२ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. यामध्ये विशेषतः वीर धरणाचा साठा सर्वाधिक महत्त्वाचा मानला जात असून सध्या धरणात ५२२५ दलघफू म्हणजे सुमारे ५.६८ टीएमसी पाणी उपलब्ध आहे.

निरा नदी खोऱ्यातील प्रमुख धरणांमध्ये भाटघर, देवघर, गुंजवणी आणि वीर धरणांचा समावेश होतो. यापैकी वीर धरणाची एकूण क्षमता ९८३५ दलघफू असून त्यातील उपलब्ध साठा उन्हाळ्याच्या



अखेरीसही समाधानकारक मानला जात आहे. अहवालानुसार वीर धरणातील पाणीसाठा सध्या सुमारे ५१ टक्क्यांच्या आसपास आहे.

मागील वर्षी म्हणजे २६ मे २०२५ रोजी वीर धरणात सुमारे ३३७५ दलघफू उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. तर यंदा हा साठा वाढून ५२२५ दलघफू इतका झाला आहे. म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा वीर धरणात सुमारे १८५० दलघफू अधिक पाणी उपलब्ध आहे. टक्केवारीत पाहिले तर यंदाची स्थिती लक्षणीयरीत्या सुधारलेली दिसत आहे.

यामुळे आगामी काही आठवडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता कमी मानली जात आहे. विशेषतः बारामती, इंदापूर आणि पुरंदर तालुक्यांतील शेती व नागरी पाणीपुरवठ्यासाठी वीर धरण महत्त्वाचा आधार मानला जातो.

अहवालानुसार यंदाच्या रब्बी आणि उन्हाळी हंगामात निरा डावा व उजवा कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या आवर्तनानुसार निरा प्रणालीतील दोन्ही कालव्यांतून सिंचनासाठी पाणीपुरवठा सुरू आहे.

निरा डावा कालव्याद्वारे विविध टप्प्यांमध्ये पाणी सोडण्यात आले असून १५ ऑक्टोबर २०२५ पासून आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे निरा उजवा कालव्याद्वारेही रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला आहे.

निरा उजवा कालवा : सुमारे १५५० क्युसेक विसर्ग सध्या सुरू आहे. वीर धरणातून सोडण्यात येणारे पाणी बारामती, इंदापूर, माळशिरस, पुरंदर, फलटणसह अनेक भागातील शेतीसाठी जीवनरेखा मानले जाते. ऊस, डाळिंब, भाजीपाला आणि इतर पिकांसाठी सध्या सिंचन सुरू असल्याने शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे.

### पावसापूर्वी साठा टिकवण्याचे आव्हान

मान्सून येण्यासाठी अजून काही दिवस बाकी असताना उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे पाटबंधारे विभागासमोर मोठे आव्हान आहे. सध्या पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक वापर यामध्ये संतुलन राखत पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात येत आहे. दरम्यान, निरा प्रणालीतील धरणांमध्ये यंदा मागील वर्षाच्या तुलनेत चांगला साठा असल्याने प्रशासनासह शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. विशेषतः वीर धरणातील वाढीव साठा आगामी काही आठवडे मोठा आधार ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## तिकोणा गडावरील तळजाई टाक्याची स्वच्छता

कोळवण (दै. संध्या)

सह्याद्रीच्या कुशीत विसावलेल्या ऐतिहासिक मुळशी व मावळ तालुक्याच्या सिमेवर डौलात उभा असणाऱ्या तिकोणा गडावर शासनाचे पुरातत्व विभाग व विविध संस्था संघटनांकडून संवर्धनाचे कार्य सुरू आहे. या संवर्धन कार्याच्या कामासाठी पाण्याचा मोठ्या प्रमाणात करावा लागणारा वापर व यावर्षीचा तीव्र उन्हाळा यामुळे तिकोणा गडावरील तळजाई हे पाण्याचे टाके अनेक वर्षांनंतर कोरडे पडले होते. या टाक्यात साचलेले दगड गोठे व गाळ उपसल्यास या टाक्याचे पाणी स्वच्छ होण्यास व साठवण क्षमता वाढण्यास मदत होणार होती हि बाब ओळखून श्री शिवदुर्ग संवर्धन संस्था पुणे व सह्याद्री आणी मी परिवाराच्या वतीने स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेत मुळशी व मावळ तालुक्यातील शेकडो मावळे सहभागी झाले होते. तिकोणा गडावरील तळजाई टाकीमधील तब्बल दीडशे वर्षांपासून साचलेला गाळ, माती आणि दगड काढून स्वच्छ करण्याचे कार्य या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर करण्यात आले. या दुर्गसेवेसाठी श्री शिवदुर्ग संवर्धन पुणे, सह्याद्री आणि मी परिवार, सह्याद्री भटकंती सामाजिक प्रतिष्टान, स्वराज्याचे शिलेदार, व अखिल शिवजन्म उत्सव समिती भुगाव येथून दुर्गप्रेमी मावळ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले. हे पाण्याचे टाके खूपच मोठे व खोल असून त्याची चारही बाजूची तटबंदी ढासळली असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात दगड व गाळ साचलेला आहे. तो काढण्यासाठी आणखी खूप काम करावे लागणार आहे. त्यासाठी शिवप्रेमीची गडप्रेमींची तन-मन-धन पूर्वक मोठी मदत लागणार आहे. यासाठी पुढे यावे असे आवाहन श्रीशिवदुर्ग संवर्धन संस्थेचे पदाधिकारी राजेश नेलगे यांनी केले आहे.

## आंबा गुणवत्तेसाठी स्कॅनिंग मशीनवर अनुदान द्या

### राहुल शेवाळे यांची केंद्रीय कृषिमंत्र्याकडे मागणी

लोणी काळभोर (दै. संध्या)

कोकणातील प्रसिद्ध देवगड हापूस आंब्याला आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळत असून, आंबा उत्पादन क्षेत्रात नवे प्रयोग सुरू झाले आहेत. पुण्यातील प्रगतशील आंबा बागायतदार राहुल शेवाळे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चव्हाण यांची भेट घेत देवगड हापूस आंब्याची पेटी भेट दिली.

यावेळी त्यांनी कोकणातील आंबा उत्पादकांच्या विविध समस्या आणि मागण्या कृषिमंत्र्यांसमोर मांडल्या. राहुल शेवाळे यांनी तीन वर्षांपूर्वी कोकणावरील प्रेमातून देवगड येथे हापूस आंब्याची बाग खरेदी केली. बदलत्या हवामानामुळे आंबा उत्पादनावर होत असलेला परिणाम लक्षात घेऊन त्यांनी AI आधारित तंत्रज्ञान आणि आधुनिक उपकरणांचा वापर सुरू केला आहे. यामुळे आंब्याची गुणवत्ता, उत्पादन



व्यवस्थापन आणि रोग नियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्याचा प्रयत्न होत आहे. आंब्याची गुणवत्ता तपासण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक स्कॅनिंग मशीनसाठी शासनाने अनुदान द्यावे, अशी प्रमुख मागणी त्यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे केली. सध्या या मशीनची किंमत ४० ते ५० लाख रुपये असल्याने सामान्य शेतकऱ्यांना ती खरेदी करणे शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

यासोबतच देवगड हापूसमध्ये वाढत चाललेल्या 'साका' समस्येवर सखोल संशोधन करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. आंबा उत्पादकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास जागतिक बाजारपेठेत देवगड हापूसची गुणवत्ता आणि मागणी आणखी वाढू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राहुल शेवाळे यांना दिल्लीमध्ये सविस्तर चर्चेसाठी निमंत्रित करत सकारात्मक सहकार्याचे आश्वासन दिले.यावेळी खासदार मेघाताई कुलकर्णी,सिद्धार्थ शेवाळे, सार्थक शेवाळे उपस्थित होते.

पारंपरिक कोकणी हापूस आणि आधुनिक AI टेक्नॉलॉजी यांची सांगड भविष्यात देवगड हापूसला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे शेवाळे यांच्या मागणीला केंद्रीय कृषि मंत्र्यांनी देखील सकारात्मक भूमिका दाखवली आहे.

## रांजणीच्या खडकवाडीत केबलचोरीचा कहर; ५५ शेतकऱ्यांचे सहा लाखांचे नुकसान

### पोलिस तपासाची मागणी तीव्र

पुणे (दै. संध्या)

रांजणी (ता. आंबेगाव) येथील मीनानदी किनारी खडकवाडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी ५५ शेतकऱ्यांच्या कृषिपंपाची केबल चोरी केल्याची घटना मंगळवार(ता.२६) रोजी उघडकीस आली.यामध्ये शेतकऱ्यांचे सुमारे सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. रांजणी येथील खडकवाडी मीना नदी पात्रातील नरसिंह बंधाऱ्याजवळ जवळपास ५५ हून अधिक शेतकऱ्यांचे वीज कृषीपंप आहेत. खडकवाडी परिसरातील शेतकऱ्यांनी कृषीपंपांसाठी टाकलेल्या केबल सोमवार (ता.२५) रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी कापून नेल्या.



चोरट्यांनी मीना नदी पात्राच्या पलीकडे केबलचे आवरण जाळून त्यातील तांब्याच्या तारा लंपास केल्याचे निदर्शनास आले आहे.

मंगळवारी सकाळी शेतकरी नेहमीप्रमाणे कृषी पंप सुरू करण्यासाठी गेले असता हा प्रकार उघडकीस आला,अनेक ठिकाणी केबल कापलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

गेल्या सहा महिन्यांतील ही केबल चोरीची ही दुसरी मोठी घटना आहे. यापूर्वीही अशाच प्रकारे केबल चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र त्या प्रकरणातील चोरट्यांचा अद्याप शोध लागलेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी भयभीत झाले आहेत,तरी पोलिसांनी या दोन्ही चोरींचा तपास लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सध्या शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटातून जात आहेत. त्यातच अवकाळी पावसामुळे अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत केबल चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

## आळंदीतील दानपेटी चोरी प्रकरणानंतर देवस्थान प्रशासन सतर्क

### व्यवस्थापकांसह कर्मचाऱ्यांकडून खुलासा

आळंदी (दै. संध्या)

आळंदीतील संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी मंदिरात सेवकाने दानपेटीतील पैशांची चोरीची घटना दुर्दैवी असून देवस्थानच्या व्यवस्थापकासह अन्य तीन कर्मचाऱ्यांकडून चोरीच्या घटनेबाबत खुलासा मागवण्यात आला आहे. परिणामी देवस्थान ने सुरक्षा आणि आर्थिक नियंत्रण व्यवस्थेत मोठे बदल जाहीर केले आहेत. देवस्थानच्या अन्नदान आणि कॅश मोजणी विभागात कोणताही स्वयंसेवक नियुक्त केला जाणार नाही. मुख्य व्यवस्थापकांच्या उपस्थितीतच दानपेट्या उघडल्या जातील. संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ शूटिंग करण्यात येईल तसेच अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली रक्कम मोजली जाणार आहे. मोजणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांची झडती घेण्यात येणार असल्याचेही आज झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये आळंदी देवस्थाने भूमिका स्पष्ट केली. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात दानपेटीतील रकमेच्या चोरीचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दानपेटीतील पैशांची चोरी करणाऱ्या विशाल वारूळे प्रकरणातील पोलिस तपासाचा पाठपुरावा सुरू असून



दोषींना पाठीशी घातले जाणार नाही, अशी भूमिका देवस्थान प्रशासनाने स्पष्ट केली आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर आळंदी देवस्थानतर्फे आळंदी येथील भक्त निवासात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी संपूर्ण घटनेची माहिती दिली.यावेळी प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, चैतन्य महाराज कबीर, पुरुषोत्तम महाराज पाटील, तसेच ग्रामस्थ प्रतिनिधी म्हणून डि.डि.भोसले, नंदकुमार कुऱ्हाडे, विलास घुंडरे, रामभाऊ भोसले, संजय घुंडरे आणि नगरसेवक सचिन गिलबिले उपस्थित होते. यावेळी ॲड राजेंद्र उमाप यांनी सांगितले, विशाल वारुळे नावाचा स्वयंसेवक मंदिरातील विविध सेवांमध्ये कार्यरत होता. सीसीटीव्ही तपासणीदरम्यान त्याच्या हालचाली संशयास्पद आढळल्यानंतर तत्काळ चौकशी सुरू केली. २२ मे २०२६ रोजी सीसीटीव्ही विभागातील कर्मचारी श्रीकांत लवांदे हे मागील आठवड्याचे फुटेज तपासत असताना, १२ मे, १३ मे आणि १६ मे रोजी विशाल वारुळे हा कॅश विभागातून हार, फुले आणि प्लास्टिकच्या छोट्या पोत्यामध्ये काही वस्तू इतरांच्या नजरेआड नेत असल्याचे दिसून आले. त्यानंतर आळंदी पोलिसांशी संपर्क साधून संबंधित व्यक्तीला पोलिसांच्या ताब्यात दिले आणि अधिकृत फिर्याद दाखल करण्यात आली. मंदिरात अनेक वर्षांपासून विविध सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक स्वच्छता आणि अन्नदान सेवेत सहभागी होत असतात. काही वारकरी विद्यार्थीही मागील काही वर्षांपासून अन्नदान विभागात सेवा देत. विशाल वारुळेनेही अन्नदान विभागातून काम सुरू करून कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन केला. वारी काळात स्वयंपाक व्यवस्थेमध्येही त्याने काम केले. मात्र इतरांची नजर चुकवत हे कृत्य केल्याचे विश्वस्तांनी सांगितले. मंदिरातील सर्व कर्मचारी, स्वच्छता सेवक आणि सुरक्षा रक्षकांसाठी गणवेश ओळखपत्र सक्तीचे करण्यात आले.

मंदिरात प्रवेश आणि बाहेर पडताना सुरक्षा तपासणी बंधनकारक करण्यात आली. कर्मचाऱ्यांनी बरोबर येताना कोणत्याही प्रकारची पिशवी सोबत आणू नये तसेच बाहेर पडताना घेऊन जाऊ नये याबाबत तपासणी केली जाणार आहे. दानपेटीतील रक्कमचे व्हिडिओ शूटिंग केले जाणार आहे. मंदिर प्रशासन अधिक पारदर्शक आणि सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक ईआरपी सॉफ्टवेअर प्रणाली कार्यान्वित करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.